


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८० ■ रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# नवनीत राणा म्हणजे विषवल्ली

## विजय वडेट्टीवारांची बोचरी टीका, 'हिरवे साप' म्हणत राणांचा पलटवार

प्रतिनिधी १९ एप्रिल

**नागपूर / अमरावती:** माजी खासदार नवनीत राणा यांच्यावर दोन समाजात तेढ निर्माण करणारी वक्तव्य केल्या प्रकरणी गुन्हे दाखल झाले पाहिजेत, त्यांच्यासोबतच डॉ.अनिल बोंडे यांच्यावरही गुन्हे दाखल झाले पाहिजे, त्यांनी अमरावती प्रकरणी चुकीची माहिती दिली आहे, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, नवनीत राणा ही जातीय विष पेरण्यासाठी पोसलेली एक विषवल्ली आहे, असे मी मानतो. जात आणि धर्मामध्ये भांडण लावून सत्तेची पोळी कशी शेकता येईल, अशा प्रकारे पाणी घालून पोसलेली विषवल्ली आहे, असे म्हणत त्यांनी नवनीत राणांवर एकेरी टीका केली आहे.



### नवनीत राणांना अटक करा : विजय वडेट्टीवार

त्यांना हनुमान चालीसाच्या दोन ओळी बोलता येत नाही. ते हिंदू धर्माच्या गोष्टी बोलत आहेत. खरात प्रकरणावर ब्र न काढणारी बाई. मुस्लीम तरुण दिसल्याबरोबर बावचळल्यासारखी बोलते हे अत्यंत घृणास्पद आहे. त्यांचा निषेध करावा तितका कमी आहे. नवनीत राणा यांनी धर्मांध पसरविण्याचा आणि दोन धर्मात तेढ पसरविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक व्हायला पाहिजे, अशी टीका त्यांनी नवनीत राणा यांच्यावर केलीय.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, महिलांवर अत्याचार झाला असेल तर तिथे जात-धर्म-पंथ येतो कुठे? असे कृत्य करणारा नालायकच असतो त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. अमरावती प्रकरणी कोणी बुरख्या वाल्या नव्हत्या म्हणता ते त्यांना कसे माहिती? कशाच्या आधारावर हे बोलल्या? या बाईची सवय आहे ही अतिशय जातीयवादी आणि धर्मांदली आहे. लोकांनी निवडणुकीत पाडले आणि जिरवली तरी हे शुद्धीवर येत नाही. तुमच्याकडे पोलिस आहे सर्व यंत्रणा आहेत तुम्ही प्रकरणाची माहिती घ्या, उगाच तोंडाचा वाफा कशाला काढत आहात, तुमच्या शब्दांना आवर घाला, माहिती घेऊन बोला.विजय वडेट्टीवार म्हणाले की, अमरावती प्रकरणातील मुली या कोण आहेत हे महत्त्वाचे नाही. या प्रकरणात काय जात आणि धर्म महत्त्वाचा नसतो. खरात संदर्भात ब्र शब्द न काढणारी बाई मुस्लीम तरुण दिसताच बावचळल्यासारखी बोलते हे अत्यंत घृणास्पद आहे, त्यांचा निषेध करावा तितका कमी आहे.

### नवनीत राणांचा विजय वडेट्टीवारांवर पलटवार



दरम्यान, नवनीत राणा यांनी देखील विजय वडेट्टीवार यांच्यावर पलटवार केलाय. हे सगळे चिल्लर लोक आहेत. त्यांच्यावर बोलण्याची मला गरज नाही. काँग्रेसने हिरवे विषारी साप पाळून ठेवले आहेत. म्हणून ते वळवळ करत आहेत. हे सगळे प्रकार आता बाहेर येत आहेत. काँग्रेसच्या काळात या हिरव्या सापांना जपण्याचं काम काँग्रेसने केलं आणि हे प्रकरण दाबण्याचे काम काँग्रेसने केलं. हिरव्या सापांना ठेचण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस करतील. काँग्रेसवाल्यांना माझं एवढं चांगलं आहे की, महिलांवर बोलण्याच्या आधी तुमच्या घरी पाहा. तुमच्या घरातही मुली आहेत. या चिल्लर माणसांनी नाशिकच्या टी सी एस प्रकरणावर का बोललं नाही? असे म्हणत नवनीत राणा यांनी विजय वडेट्टीवार यांच्यावर हल्लाबोल केला.

## बदल्यांना स्थगिती!

**मुंबई :** महाराष्ट्रातील जनगणनेसाठी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांतील गट 'क' व 'ड' कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना स्थगिती देण्यात आली आहे. ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जनगणनेशी संबंधित शिक्षकांसह सर्व कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदलीस स्थगिती देण्यात आली आहे. जनगणना २०२६ यशस्वी आणि प्रभावीपणे पार पडावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

जनगणनेसाठी आवश्यक मनुष्यबळ स्थिर राहणार आहे. माहिती संकलन, नोंदणी व पडताळणी प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण होण्यास मदत होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्रात २०२६-२७ ची जनगणना डिजिटल पद्धतीने होणार आहे. पहिला टप्पा १६ मे ते १४ जून या कालावधीत घरांची यादी व मोजणीसाठी राबवला जाणार आहे. १ मे ते १५ मे २०२६ दरम्यान 'स्व-गणना' ऑनलाइन उपलब्ध असेल.

## मातृशक्तीचा सन्मान! आ. हरीश पिंपळे यांनी तातडीने मान्य मागणी

### आर आर सी च्या बातमीनंतर तत्काळ ५ लाखांचा निधी मंजूर आमदारांच्या कार्यतत्परतेचे सर्वत्र कौतुक





प्रतिनिधी १९ एप्रिल

**बार्शीटाकळी :** लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील संवादातूनच विकासाची गंगा वाहते, याचा प्रत्यय नुकताच बार्शीटाकळी तालुक्यातील राजंदा येथे आला आहे. राजंदा गावातील महिलांनी मांडलेल्या समस्यांची गंभीर दखल घेत, मूर्तिजापूर विधानसभेचे आमदार हरीश पिंपळे यांनी संवेदनशीलतेचा परिचय देत तत्काळ ५ लाख रुपयांच्या विकासकामाला मंजुरी दिली आहे.

नुकत्याच झालेल्या एका भेटीदरम्यान राजंदा गावातील महिलांनी आपल्या भागातील प्रलंबित समस्यांकडे आमदारांचे लक्ष वेधले होते. सोशल मीडियावर या संवादाची चर्चा झाल्यानंतर, आमदारांनी राजकारण न करता थेट 'ॲक्शन मोड'मध्ये येत गावकऱ्यांच्या मागणीला न्याय देण्याचा निर्णय घेतला. आर आर सी च्या बातमीनंतर या प्रकरणाची तातडीने दखल घेत त्यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे.

गेल्या १७ वर्षांपासून मतदारसंघाचे नेतृत्व करताना आमदार पिंपळे यांनी नेहमीच जनभावनेचा आदर केला आहे. राजंदा येथील घटनेनंतर त्यांनी कोणतीही दिरंगाई न करता महिलांच्या मागणीचा मान राखला. गावातील मूलभूत सोयी-सुविधांसाठी ५ लाख रुपये मंजूर केले. प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. आ. पिंपळे यांनी घोषणा करताच मातृशक्तीच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर उमटली आणि त्यांनी मंडपात टाळ्यावाजवित घोषणेचे स्वागत केले.

'जनतेच्या समस्या मांडण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. राजंदा येथील माता-भगिनींनी मांडलेली व्यथा माझ्यापर्यंत पोहोचली आणि त्यावर तात्काळ कार्यवाही करणे हे माझे कर्तव्यच होते. विकासाच्या बाबतीत मी सदैव कटिबद्ध आहे.'

**– हरीश पिंपळे,** आमदार (मूर्तिजापूर विधानसभा)

### गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण

सुरुवातीला काही प्रमाणात नाराजी व्यक्त होत असली, तरी आमदारांनी ज्या तत्परतेने निधी मंजूर केला, त्यावरून आता ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. विशेषतः महिला वर्गाने आपल्या मागणीची दखल घेतल्याबद्दल आमदारांचे आभार मानले आहेत. 'लोकप्रतिनिधी असावा तर असा', अशा प्रतिक्रिया आता राजंदा परिसरातून उमटत आहेत.

## बँड वाजवून डांस करेल - अंजली दमानिया

**मुंबई :** नारी शक्ती वंदन दुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर झाले. हे विधेयक आणण्यामागे भाजपचा वेगळाच डाव असल्याचा आरोप विरोधक करत आहे. त्यानंतर भाजपने देशभरात काँग्रेससह विरोधी पक्षांना टार्गेट करणे सुरू केले. यावरून आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एक ट्वीट करत सरकारची कानउघडणी केली आहे. महिला आरक्षणाचा इतका आग्रह तर मग मंत्रिमंडळात किती महिला मंत्री आहेत, असा थेट सवाल करत दमानियांनी सत्ताधाऱ्यांना चपराक लगावला आहे.

'विरोधी पक्ष बँड वाजवून डांस करावा. हे उद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. ज्या भाजप ने महाराष्ट्रात १४९ उमेदवारांमध्ये, फक्त १५ महिला उमेदवार निवडणुकीत उभे केले, ते असे डायलॉग मारतात? वाह! महाराष्ट्रात ३९ मंत्र्यांमध्ये केवळ ४ महिला मंत्री आहेत.

## पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालीच महिलांना मिळणार हक्क!

प्रतिनिधी १९ एप्रिल

**मुंबई :** काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेससारख्या पक्षांच्या स्वार्थी राजकारणाचा फटका देशातील महिलांना बसला. या साऱ्या घटना २१व्या शतकातील महिला पाहात आहेत आणि त्या योग्यवेळी उत्तर देतील, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात केली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालीच महिलांना त्यांचा हक्क आणि स्वाभिमान मिळणार यात काही शंकाच नाही. शिवसेना या लढाईमध्ये एनडीए सरकारच्या खांद्याला खांदा लावून आघाडीवर असेल, हे मात्र नक्की, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

लोकसभेत नारी शक्ती वंदन विधेयक नामंजूर करून देशातल्या महिलांचा अपमान करणारी जी घटना घडली, त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेले संबोधन म्हणजे विरोधकांना मोठी चपराक आहे.


## धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी १९ एप्रिल

**मुंबई :** नाशिक धर्मांतर, परतवाडा लैंगिक शोषण, खरात प्रकरण आणि मुंबईतील गोरेगाव ड्रग्ज प्रकरणांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी गृह विभागाच्या बैठकीत सविस्तर आढावा घेतला. या सर्वप्रकरणी तपास अधिक प्रभावी व निष्पक्ष करण्याचे निर्देश त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांना दिले. तसेच धर्मांतरासारखे प्रकार खपवून घेऊ नका, अशा स्पष्ट सूचनाही त्यांनी बैठकीत दिल्याचे सूत्रांनी सांगितले.या बैठकीला राज्याचे पोलिस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, एसआयटी प्रमुख तसेच वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

नाशिकमधील धर्मांतराच्या प्रकरणावर बोलताना, धर्मांतरासारखे प्रकार अजिबात खपवून घेऊ नका, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. हे प्रकरण स्वतःहून उजेडात आणल्याबद्दल नाशिक पोलिसांचे त्यांनी कौतुक केले. मात्र, आता तपास तितकाच दमदार व्हावा, यात असणाऱ्या सर्व पॅटर्नचा तपास करा, कोणताही मुद्दा तपासातून सुटू नये, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिल्याचे सूत्रांनी सांगितले. खरात प्रकरणात पीडितांचा विश्वास जिंकणे सर्वात महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणात दोषी कोणीही असो, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे, यासाठी भक्कम पुरावे गोळा करण्याचे आदेश त्यांनी दिले.

## आज अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर सोन्याला झळाळी! नागरिकांची मुहूर्त साधण्यासाठी दुकानांमध्ये गर्दी



प्रतिनिधी १९ एप्रिल

### लाइटवेट दागिन्यांना पसंती

सोन्याचे दर गगनाला भिडल्याने ग्राहकांनी जड दागिन्यांऐजी 'लाइटवेट' (हलक्या वजनाचे) आणि डिझायनर दागिन्यांना अधिक पसंती दिली आहे. विशेषतः १८ कॅरेटमधील नाजूक नेकलेस, ब्रेसलेट आणि कानातल्यांची मागणी वाढली असल्याचे सांगितले जात आहे. रविवारी अक्षय तृतीया आली असल्याने सुट्टीचा दिवस साधत सोन्याच्या खरेदीने सराफा बाजाराला अधिक झळाळी मिळल्याचे दृश्य दिसून आले.

**अकोला :** साडेतीन मुहूर्तांपैकी एक अक्षय तृतीयेचा मुहूर्त शुभ मानला जातो. या मुहूर्तावर सोने खरेदी केल्यास सोने अधिकाधिक वृद्धिंगत होते अशी सर्वसामान्यांची धारणा आहे. त्यामुळे सोन्याच्या दरात कितीही चढउतार झाले तरी मुहूर्ताच्या सणासुदीला मध्यमवर्गीयांकडून सोने खरेदी हमखास केली जाते. याचा प्रत्यय रविवरी अकोल्याच्या सराफा बाजारात दिसून आला.

यंदाची अक्षय तृतीयादेखील त्याला अपवाद ठरलेली नाही. अक्षय तृतीयेच्या पूर्वसंध्येला सोन्याच्या किमतीने दीड लाखाचा टप्पा गाठला असतानाही शहरातील विविध भागांतील सराफा दुकानांमध्ये दिवसभर ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली, त्यामुळे सराफी व्यावसायिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. जागतिक पातळीवरील युद्धजन्य परिस्थिती, राजकीय अस्थिरता आणि रुपयाच्या घसरणीमुळे बाजार कडाडला आहे.

## ११ हजार आंब्यांचा महाभोग

प्रतिनिधी १९ एप्रिल

**पुणे :** अक्षय्यतृतीयेच्या शुभमुहूर्तावर श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला ११ हजार आंब्यांचा महाभोग अर्पण करण्यात आला. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या या दिवशी गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच मंदिरात रांगा लावल्या होत्या.श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. पुण्यातील प्रसिद्ध आंबा व्यापारी देसाई आंबेवालेचे संचालक मंदार देसाई आणि त्यांच्या कुटुंबियांनी हा



महानैवेद्य अर्पण केला.

या मंगलदिनी मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. रविवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पहाटे ४ वाजता गायिका विदुषी मंजुषा पाटील यांनी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण केली.

## पॅन कार्ड नसेल तर...

**अकोला :** देशातील आर्थिक व्यवहार पारदर्शक करण्यासाठी केंद्र सरकार आणि आयकर विभागाने नियम अत्यंत कडक केले आहेत. आजच्या काळात पॅन कार्ड हे तुमच्या आर्थिक ओळखीचा सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज बनले आहे.

तुम्ही नवीन गाडी खरेदी करण्याचा विचार करत असाल, मालमत्तेत गुंतवणूक करू इच्छित असाल किंवा बँकेत मोठी रक्कम जमा करणार असाल, तर या कार्डशिवाय तुमचे काम थांबू शकते. आयकर विभागाने अशा मोठ्या आणि सामान्य व्यवहारांची यादी निश्चित केली आहे, जिथे पॅन कार्ड देणे अनिवार्य आहे.









हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी जे शुभ कार्य केलं जातं त्याचं फळ हे अक्षय्य मिळतं. अक्षय्य म्हणजेच ज्याचा कधीही क्षय किंवा नाश होणार नाही असं फळ. याच कारणामुळे हा दिवस हिंदू धर्मात शुभ मानला जातो. लक्ष्मी मातेला प्रसन्न करण्यासाठी अक्षय्य तृतीयेचा सण अतिशय शुभ मानला जातो आणि या दिवशी लक्ष्मी मातेला प्रसन्न करण्यासाठी काही उपाय केल्यास ती तुमच्यावर प्रसन्न होते आणि तुमच्या घरावर तिची कृपा सदैव राहते असे मानले जाते. अक्षय्य तृतीयेला केलेले प्रत्येक कार्य अक्षय्य फळ देते. म्हणूनच या दिवशी सुरू केलेल्या कुठल्याही कार्याचा कधीच 'क्षय' होत नाही असे म्हणतात. वैशाख मासातील शुक्ल पक्षातील तृतीया ही अक्षय तृतीया म्हणुन प्रसिध्द आहे. हिंदू आणि जैन धर्मात अक्षय्य तृतीयेला विशेष महत्त्व आहे.

# आज अक्षय्य तृतीया : खरेदीसाठी चांगला मुहूर्त



या दिवशी कोणताही विचार न करता कोणतेही नवीन काम सुरू करता येते. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी, इमारत किंवा प्लॉट खरेदी करण्यासाठी, घरात प्रवेश करण्यासाठी, सोन्याचे दागिने, कपडे, वाहने इत्यादी खरेदी करण्यासाठी, लग्न समारंभ, मुंडण समारंभ इत्यादीसाठी पंचांग पाहण्याची अजिबात गरज नाही. तुम्हाला आवडणारे कोणतेही काम तुम्ही मोकळेपणाने करू शकता. कोणत्याही प्रकारची खरेदी करू शकता.

अक्षय्य तृतीयेला आखा तीज किंवा अक्षय तीज असेही म्हणतात. यावर्षी हा शुभ दिन १९ एप्रिल रोजी रविवारी आला आहे. यावेळी लक्ष्मीमातेची पुजा हरतऱ्हेने फळते आणि इच्छुक फळ आपल्याला मिळते असं म्हणतात. म्हणून हा दिवस दुग्धशर्करा योग ठरणार आहे.

वैशाख शुद्ध तृतीयेला अक्षय्य तृतीया म्हणतात. अक्षय्य म्हणजे कधीही क्षय न पावणारी. या दिवशी जप, होम, दान इत्यादी जे काही केले जाते, ते अक्षय्य होते. हा मुहूर्त साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. कृत अथवा त्रेता युगाची सुरुवात याच तिथीने सुरू झाली, असे मानतात. 'कालविवेक' या ग्रंथामध्ये या तिथीच्या व्रताचे महत्त्व विशद केले गेले आहे. तसेच राजस्थानात या तिथीला 'आखा तीज' असेही म्हणतात. भविष्यपुराणात अक्षय्य तृतीयेचे व्रत सांगितले आहे. भार्गवार्चन-दीपिकेमध्ये स्कंदपुराण आणि भविष्यपुराण यांचे संदर्भ देऊन सांगितले आहे की, याच तिथीवर पुनर्वसू नक्षत्रावर रात्रीच्या पहिल्या प्रहरी शुभ ग्रहांच्या योगात आकाशात मिथुन राशी स्थित असताना रेणुकादेवीच्या पोटी भगवान विष्णूने परशुरामाच्या रूपात जन्म घेतला होता. या तिथीला 'परशुराम तिथी' असेही म्हणतात. या दिवशी दक्षिण भारतात परशुरामाची जयंती उत्साहात साजरी केली जाते. तसेच या दिवशी लक्ष्मी मातेला प्रसन्न करण्यासाठी विशेष पूजाही केली जाते.


भगवान श्रीकृष्ण अर्जुनास सांगतात की, या तिथीस करण्यात आलेले दान, हवन तसेच देव आणि पितर यांप्रती केलेली कार्ये कधीही व्यर्थ होत नाहीत, अविनाशी राहतात. ही तृतीया दिवसाचे दोन भाग करून पूर्वार्ध व्यापिनी घ्यावी, असे मत ज्योतिषाचार्य कृष्णाजी सोमण यांनी मांडले आहे. या तृतीयेला रोहिणी नक्षत्र व बुधवार यांचा योग असल्यास ती महापुण्यकारक समजण्यात येते. या संदर्भात भविष्यपुराणात एका व्यापाऱ्याची कथा सांगितली गेली, ती अशी : एक व्यापारी स्वतःच्या दारिद्र्य कालखंडात बुधवार व रोहिणी नक्षत्राचा योग साधून अक्षय्य तृतीयेला दान करतो. त्यास धनप्राप्ती होते आणि नंतर तो कुशावती नगरीचा पराक्रमी राजा म्हणून नावारूपास येतो. त्याचप्रमाणे जैन धर्मात अक्षय्य तृतीयेला महत्त्व आहे. ऋषभदेव यांनी पूर्णत्व प्राप्त करण्यासाठी एक वर्षाच्या काळात अन्नपाणी ग्रहण केले नव्हते. व्रत समाप्तीनंतर त्यांनी हस्तिनापूरच्या श्रेयांस नामक राजाकडे उसाच्या रसाचे प्राशन केले. त्यानंतर त्या राजाच्या राज्यात अन्नधान्यासाठी कधीही क्षय पडला नाही. यामुळेच अक्षय्य तृतीयेस 'इक्षु तृतीया' असेही म्हणतात. तसेच आयुर्वेदातील औषधी वनस्पतींची लागवड या मुहूर्तावर केल्याने त्यांची वृद्धी होते, असे मानले जाते.

या दिवशी विष्णू, शिव व पितर यांच्या प्रीत्यर्थ तृषाशमनासाठी पाण्याचा कलश ब्राह्मणाला देण्याचा व श्राद्ध करण्याचा विधी आहे. वसंत ऋतूतील कडक उन्हाळा व सृष्टीसौंदर्य यामुळे उदकुंभदानाला धर्मरूपता व या दिवसाला सणाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. या मुहूर्तावर शेतकरी पेरणी करतात. या कालास अनुरूप नृत्य-गायनादी विधी वसंतोत्सव करण्याची वहिवाट आहे. कोणतेही मंगलकृत्य अगर व्रत आचरण्यास हा अत्यंत शुभ दिवस मानला जातो. सध्याच्या काळात या शुभ मुहूर्तावर सोने, चांदी, आणि वस्त्र इ. खरेदी केले जाते. तसेच चैत्रगौरीच्या हळदीकुंकू समारंभाची सांगता याच दिवशी केली जात. यावेळी सुवासिनी हळदीकुंकू करून सौभाग्यवाण लुटतात.



## दिन विशेष

### आर्यभट पहिला भारतीय उपग्रह अवकाशात प्रक्षेपित



१९ एप्रिल १९७५ रोजी सोव्हिएत युनियनद्वारे प्रक्षेपित केलेला आर्यभट हा भारताचा पहिला स्वदेशी बनावटीचा उपग्रह होता. ५ व्या शतकातील भारतीय खगोलशास्त्रज्ञाच्या नावावरून नाव दिलेला, हा ३६० किलो वजनाचा उपग्रह भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (ISRO) एक्स-रे खगोलशास्त्र, एरोनॉमिक्स आणि सौर भौतिकशास्त्र या क्षेत्रांमध्ये प्रयोग करण्यासाठी तयार केला होता.

आर्यभट भारताच्या पहिल्या उपग्रहाची ५० वर्षे पूर्ण झाली. देशासाठी अभिमानास्पद आहे. आर्यभट्ट उपग्रहाविषयी मुख्य तपशील पहा. हे १९ एप्रिल १९७५ रोजी रशियातील कपुस्टिन यार येथून सोव्हिएत कॉसमॉस-३एम प्रक्षेपण यानाचा वापर करून प्रक्षेपित करण्यात आले.

डिझाइन आणि रचना: हा उपग्रह १.४ मीटर व्यासाचा, २६-बाजूंचा बहुभुज होता, ज्याच्या बहुतेक बाजू सौर पेशींनी (solar cells) झाकलेल्या होत्या. मोहिमेचे उद्दिष्ट: एक्स-रे खगोलशास्त्र, एरोनॉमिक्स आणि सौर भौतिकशास्त्र या विषयांमध्ये प्रयोग करण्यासाठी हा उपग्रह तयार करण्यात आला होता.

**वीजपुरवठ्याची समस्या:** जास्त काळ टिकण्यासाठी त्याची रचना केलेली असूनही, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे कक्षेत केवळ चार दिवसांनंतरच त्याने डेटा प्रसारण थांबवले. वीजपुरवठा खंडित होऊनही, ही मोहीम यशस्वी मानली गेली, ज्यामुळे उपग्रह तंत्रज्ञानातील भारताची क्षमता सिद्ध झाली. १९७६ ते १९९७ दरम्यान भारतीय दोन रुपयांच्या नोटांच्या मागील बाजूस त्याची प्रतिमा छापण्यात आली होती.

**कक्षेतील आयुष्य :** ते जवळपास १७ वर्षे कक्षेत राहिले आणि ११ फेब्रुवारी १९९२ रोजी पृथ्वीच्या वातावरणात पुन्हा प्रवेश केला. इस्रोच्या यशानंतर भारतीय प्रक्षेपण वाहनांचा विकास झपाट्याने झाला. भारताच्या अंतराळ कार्यक्रमात शास्त्रज्ञांनी योगदान दिले. प्रमुख व्यक्ती त्यात होत्या. परंतु १९७५ नंतर ख-या अर्थाने योग्य दिशा मिळाली. आर्यभट उपग्रहाचे यश राष्ट्रीय अवकाश संशोधन क्षेत्रात अतिशय दूरगामी ठरले. भारतीयांना आत्मविश्वास दिला.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# वॉर्म-अप आणि स्ट्रेचिंग न करता व्यायाम करणे किती धोकादायक?

जिममध्ये, मैदानावरील उपक्रमांमध्ये, क्रीडा प्रकारांमध्ये व्यायाम सुरू करण्यापूर्वी आणि व्यायाम झाल्यानंतर वॉर्म-अप आणि स्ट्रेचिंग करणे आवश्यक आहे, असे आपण नेहमी ऐकत असतो. पण वॉर्म-अप म्हणजे नेमके काय? स्ट्रेचिंग केल्याने नेमके काय होते? खरंच हे करणे आवश्यक आहे का, की हा फक्त वेळेचा अपव्यय आहे? हे प्रश्न अनेकांच्या मनात येत असतात. सर्वप्रथम, वॉर्म-अप म्हणजे काय ते पाहूया.

१. वॉर्म-अपचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे शरीराला वर्कआउटसाठी तयार करणे.

कोणत्याही प्रकारचा व्यायाम करण्यापूर्वी वॉर्म-अप केल्याने सेंट्रल नर्व्हस सिस्टीम अलर्ट होते. त्यामुळे व्यायाम करताना मसल्स आणि जॉईंटस वर अचानक ताण येत नाही आणि जखम होण्यापासून बचाव होतो.

२. वॉर्म-अपमुळे शरीरातील प्रत्येक जॉईंटची मुव्हमेंट वाढते, ज्यामुळे वर्क आउट दरम्यान व्यायाम योग्य मुव्हमेंट मध्ये करता येते.

३. शरीरातील प्रत्येक जॉइंट मध्ये सिनोव्हिएल फ्ल्यूईड असतो. वर्क आऊट दरम्यान जर हा फ्ल्यूईड योग्य प्रकारे कार्यरत झाला नाही, तर त्या जॉईंट मध्ये जखम होण्याची शक्यता जास्त असते. त्या ठिकाणच्या हाडाला सुद्धा जखम किंवा डॅमेज होऊ शकते. वॉर्म-अपमुळे सिनोव्हिएल फ्ल्यूईड ॲक्टिव होतो, त्यामुळे वर्क आऊट दरम्यान जॉईंट हेल्थ चांगल्या प्रकारे राहते.

४. वॉर्म-अपमुळे हार्ट रेट हळूहळू मेनटेन होतो आणि रक्त प्रवाह योग्य प्रकारे सुरू होतो,

ज्यामुळे शरीराला वर्क आऊट दरम्यान ऑक्सिजनेटेड रक्त योग्य प्रमाणात मिळतो. त्यामुळे वर्क आऊट परफॉर्मन्स सुद्धा वाढते.

५. वॉर्म-अपमुळे शरीर हळूहळू वर्क आऊट साठी तयार होते आणि यामध्ये सीएनएसचा सुद्धा महत्त्वाचा वाटा असतो.

त्यामुळे वर्क आऊट दरम्यान फोकस सुद्धा वाढतो. याशिवायही वॉर्म-अपचे वर्क आऊट मध्ये अनेक फायदे मिळतात. म्हणूनच वर्क आऊटची सुरुवात चांगल्या वॉर्म-अपने करणे खूप आवश्यक आहे. जशी वर्क आऊटची सुरुवात वॉर्म-अपने करणे महत्त्वाचे आहे, तशीच वर्क आऊटचा शेवट स्ट्रेचिंगने करणे सुद्धा तेवढेच आवश्यक आहे. स्ट्रेचिंग नियमितपणे करण्याचे मुख्य फायदे म्हणजे लवचिकता वाढवणे, सांध्यांची हालचाल क्षमता सुधारणे, स्नायूंमध्ये रक्तप्रवाह वाढवणे, ताण कमी करणे आणि दुखापतीचा धोका कमी करणे. हे केवळ शारीरिक कार्यक्षमता सुधारत नाही, तर शरीराची ठेवण सुधारण्यास आणि स्नायूंच्या वेदनांपासून आराम मिळविण्यासही मदत करते.

**स्ट्रेचिंगचे प्रमुख फायदे:**

**१) लवचिकता मध्ये वाढ :**

नियमित स्ट्रेचिंग केल्याने स्नायू लांब आणि लवचिक बनतात, ज्यामुळे दैनंदिन कामे अधिक सोप्या पद्धतीने करता येतात.

**२) दुखापतीपासून बचाव :**

व्यायामापूर्वी आणि व्यायामानंतर स्ट्रेचिंग केल्याने स्नायूंमध्ये ताण किंवा टिअर होण्याचा धोका कमी होतो, कारण हे कडक स्नायूंना मऊ आणि तयार करते.

**३) उत्तम रक्ताभिसरण :**

स्ट्रेचिंगमुळे स्नायूंमध्ये रक्तप्रवाह वाढतो, ज्यामुळे पोषक घटक स्नायूंना योग्य प्रकारे मिळतात.

**४) सांध्यांची हालचाल क्षमता वाढते :**

हे सांध्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेने हालचाल करण्यास मदत करते, जी वयानुसार कमी होत जाते.

**५) ताण कमी होतो :**

स्ट्रेचिंग केल्याने शरीरातील ताणलेले स्नायू शांत होतात, ज्यामुळे मनाला शांतता मिळते आणि मानसिक ताण कमी होतो.

**६) शरीराची ठेवण सुधारते :**

पाठ, खांदे आणि छातीचे स्नायू स्ट्रेच केल्याने चुकीच्या बसण्यामुळे किंवा उभे राहण्यामुळे होणारे शरीराचे दोष सुधारण्यास मदत होते.

**७) स्नायूंच्या वेदनांमध्ये आराम :**

व्यायामानंतर स्ट्रेचिंग केल्याने स्नायूंचा कडकपणा कमी होतो आणि रिकव्हरी जलद होते.

**८) क्रीडा कामगिरी सुधारते :**

खेळाडूंमध्ये स्ट्रेचिंगमुळे हालचाली अधिक सहज आणि प्रभावी होतात, ज्यामुळे कामगिरी सुधारते. वॉर्म-अप आणि स्ट्रेचिंग हे कोणत्याही व्यायामाचे दोन अत्यंत महत्त्वाचे भाग आहेत. वॉर्म-अप शरीराला व्यायामासाठी वॉर्म-अप आणि स्ट्रेचिंग हे कोणत्याही व्यायामाचे दोन अत्यंत महत्त्वाचे भाग आहेत. वॉर्म-अप शरीराला व्यायामासाठी तयार करून स्नायू आणि सांध्यांना सक्रिय करतो, तर स्ट्रेचिंग स्नायूंना लवचिक ठेवून दुखापतीचा धोका कमी करते आणि रिकव्हरी जलद करते.या दोन्ही गोष्टी नियमितपणे केल्यास व्यायाम अधिक सुरक्षित, प्रभावी आणि परिणामकारक होतो.



गणेश अंभोरे
द फिटनेस हब ( फिटनेस प्रोफेशनल अँड न्यूट्रिशनिस्ट )

## गेम डिझाइनिंग आणि डेव्हलपर क्षेत्रात करा करिअर !

आता प्रत्येक काम कॉम्प्युटर, मोबाईल आणि विविध तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होते म्हणून आजच्या काळाला डिजिटल युग म्हटले जाते. या डिजिटायझेशनमुळे खेळ आणि खेळण्याची पद्धतही बदलली आहे. पूर्वी मुलं मित्रांसोबत रस्त्यावर किंवा घराबाहेर पार्कमध्ये गेम खेळायचे पण आजच्या काळातील मुलं मित्रांसोबत घरी बसून स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर सीओडी, जीटीए, फिफा, पब्जी किंवा डोटा सारखे गेम खेळत असतात. मोबाईल किंवा कॉम्प्युटरवर गेम खेळण्याच्या या तंत्राला डिजिटल गेमिंग म्हणतात. डिजिटल गेमिंग खेळणाऱ्यांची संख्या जगभरात वाढतेय. म्हणूनच डिजिटल गेमिंग क्षेत्रात चांगले करिअर करण्याची संधी आहे.

गेम डिझायनिंगमध्ये सर्टिफिकेट लेव्हल कोर्स करण्यासाठी तुम्ही दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तर डिप्लोमा आणि ग्रॅज्युएट लेव्हल कोर्स करण्यासाठी तुम्ही बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी, तुमच्याकडे कोणत्याही टेक्निकल क्षेत्रातील पदवी असणे आवश्यक आहे. गेमिंग इंडस्ट्रीत येण्यासाठी आजच्या काळात अनेक कोर्सेस आहेत. सर्टिफिकेट लेव्हल कोर्सेस करायचे असतील तर गेमिंगमधील सर्टिफिकेट कोर्सेस, गेम आर्ट आणि डिझाइनमधील सर्टिफिकेट कोर्सेस उपलब्ध आहेत. डिप्लोमासाठी डिप्लोमा इन गेम डिझाईन आणि इंटिग्रेशन, प्रोफेशनल डिप्लोमा इन गेम आर्ट, डिप्लोमा इन ॲनिमेशन, गेमिंग आणि स्पेशल इफेक्ट्स, ॲडव्हान्स्ड डिप्लोमा इन गेम आर्ट आणि थ्रीडी गेम कंटेंट क्रिएशन यासारखे कोर्स करता येऊ शकतात. ग्रॅज्युएशनसाठी तुम्ही ग्राफिक्स, ॲनिमेशन आणि गेमिंगमध्ये बॅचलर ऑफ सायन्स, डिजिटल फिल्ममेकिंग आणि ॲनिमेशनमध्ये बॅचलर ऑफ आर्ट्स, कॉम्प्युटर सायन्स आणि गेम डेव्हलपमेंटमध्ये बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी (बी-टेक) हे कोर्स करु शकता.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र शासनाची महिलांसाठी राबविण्यात आलेली एक महत्त्वाची कल्याणकारी योजना आहे. या योजनेचा मुख्य उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, त्यांच्या आर्थिक गरजा भागवणे आणि समाजात त्यांचे स्थान अधिक मजबूत करणे होय. महाराष्ट्र राज्यात महिलांचे सक्षमीकरण हे सामाजिक व आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे घटक मानले जाते. समाजाच्या प्रगतीसाठी महिलांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी आणि त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. ही योजना केवळ आर्थिक सहाय्य देणारी नसून महिलांच्या सन्मान, स्वाभिमान आणि आत्मविश्वासाला बळकटी देणारी एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे.

आजच्या आधुनिक युगातही अनेक महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र राहण्याची संधी मिळत नाही. विशेषतः ग्रामीण भागात आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये महिलांना स्वतःच्या गरजांसाठीही इतरांवर अवलंबून राहावे लागते. अशा परिस्थितीत महिलांना नियमित आर्थिक आधार मिळावा, त्यांच्या दैनंदिन गरजा भागाव्यात आणि त्या स्वावलंबी व्हाव्यात, या उद्देशाने ही योजना राबविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १ हजार ५०० इतकी आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाते. ही रक्कम कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचते, त्यामुळे पारदर्शकता राखली जाते. ही रक्कम महिलांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्य खर्चासाठी किंवा इतर आवश्यक गोष्टींसाठी उपयोगी पडते. यामुळे महिलांना स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याचे स्वातंत्र्य मिळते आणि त्यांच्या आत्मसन्मानात वाढ होते.

या योजनेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सोपी आणि सुलभ ठेवण्यात आली. इच्छुक महिलांनी महा-ई-सेवा केंद्रावर जाऊन किंवा अधिकृत ऑनलाइन पोर्टलवर अर्ज करावा. अर्ज करताना आधार कार्ड, बँक खाते तपशील, रहिवासी दाखला यांसारखी आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतात. तसेच अर्जदार महिला महाराष्ट्राची कायमस्वरूपी रहिवासी असावी. तिचे वय निश्चित मर्यादेत असावे आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती दुर्बल किंवा मध्यमवर्गीय असावी. काही अटींनुसार कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत नसावा. अर्जाची तपासणी आणि पडताळणी पूर्ण झाल्यानंतर पात्र महिलांच्या बँक खात्यात थेट आर्थिक सहाय्य जमा केले जाते.

या योजनेमुळे महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येत आहेत. आर्थिक मदतीमुळे त्यांना घरखर्चात हातभार लावता येतो. मुलांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष देता येते. आरोग्यविषयक गरजा पूर्ण करता येतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्या कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होतात. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही केवळ आर्थिक मदत देणारी योजना नाही, तर ती महिलांच्या सन्मान, स्वाभिमान आणि सक्षमीकरणाचा पाया मजबूत करणारी योजना आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांचे सशक्तीकरण आवश्यक आहे, आणि ही योजना त्या दिशेने उचललेले एक प्रभावी आणि दूरदर्शी पाऊल आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला अकोला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे एकूण ४ लाख २ हजार महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार महिला महाराष्ट्राची कायमस्वरूपी रहिवासी असणे आवश्यक आहे. तिचे वय साधारणपणे २१ ते ६५ वर्षांच्या दरम्यान असावे. तसेच तिच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती दुर्बल किंवा मर्यादित असावी. काही अटींनुसार, कुटुंबातील सदस्य सरकारी सेवेत नसावा. या निकषांमुळे ही योजना खऱ्या अर्थाने गरजू महिलांपर्यंत पोहोचते.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एक प्रभावी आणि दूरदर्शी उपक्रम आहे. ही योजना महिलांना केवळ आर्थिक मदत देत नाही, तर त्यांना स्वावलंबी बनवते, त्यांच्या आत्मसन्मानात वाढ करते आणि समाजात त्यांचे स्थान अधिक मजबूत करते. समाजाच्या प्रगतीसाठी महिलांचे सशक्तीकरण आवश्यक आहे, आणि ही योजना त्या दिशेने उचललेले एक ठोस आणि महत्त्वपूर्ण पाऊल आहे.



**सचिन गजभिये**
जिल्हा माहिती कार्यालय, अकोला

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## विदर्भाच्या कन्येची शैक्षणिक भरारी; डॉ. प्रणिता शिंदे यांना पीएचडी प्रदान

**अकोला:** शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत विदर्भाच्या शैक्षणिक परंपरेला नवा मानबिंदू बहाल करणाऱ्या डॉ. प्रणिता कृष्णराव शिंदे (देऊळकर) यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.सध्या त्या विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती येथे स्वास्थ्यवृत्त व योग विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या संशोधनातून आरोग्य विज्ञान क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान नोंदवले आहे. त्यांचा संशोधन प्रबंध ङ्घनीट परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील भ्रामरी प्राणायामाच्या परिणामांचा अभ्यासङ्घ या विषयावर आधारित असून, विद्यार्थ्यांच्या वाढत्या मानसिक तणावाच्या पार्श्वभूमीवर तो अत्यंत उपयुक्त व दिशादर्शक ठरणारा आहे.या संशोधन कार्यासाठी त्यांना यशवंत आयुर्वेद महाविद्यालय, कोल्हापूर येथील ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. प्रा. कल्पना के. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली डॉ. प्रणिता यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने संशोधन पूर्ण केले आहे.

## नागरिकांना महानगरात 'सनकुल' औषधाचे वितरण



**अकोला:** पर्यावरण संवर्धन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या रानमित्र' संघटना व 'चव्हाण होमिओपॅथिक क्लिनिक' यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांचे उन्हापासून रक्षण व्हावे यासाठी महानगरात 'सनकुल' औषधाचे मोफत वितरण करण्यात आले.अकोल्याचा वाढता भीषण उन्हाळा लक्षात घेता अकोलेकरांना तो सुसह्य व्हावा यासाठी पावले रानमित्र संघटना व चव्हाण होमिओपॅथिक क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. रानमित्र संघटनाच्या अध्यक्ष डॉ. पल्लवी दिवेकर यांच्या नेतृत्वात जठार पेठ चौक येथे आयोजित या वितरण उपक्रमात होमिओपॅथिक तज्ञ डॉ. योगिता चव्हाण यांनी या औषधीची उपयुक्तता प्रतिपादीत केली.

## तेल्हाऱ्यात उष्माघाताचा धोका वाढतोय; अर्धा उन्हाळा उलटला तरी 'उष्माघात कक्ष' गायब!

**तेल्हारा:** शहरासह ग्रामीण भागात तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना उष्माघाताचा धोका गंभीर बनत आहे. मात्र, याच पार्श्वभूमीवर शासनाच्या सूचनांनुसार उभारला जाणारा 'उष्माघात कक्ष' अद्यापही अस्तित्वात नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब समोर आली आहे.

एप्रिल महिना संपत आला असून उन्हाळ्याचा अर्धा टप्पा उलटून गेला आहे. तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा आकडा ओलांडला असताना नागरिकांना तातडीची वैद्यकीय मदत देण्यासाठी आवश्यक असलेली व्यवस्था कागदावरच दिसत आहे. प्रत्यक्षात मात्र शहरातील मुख्य रुग्णालयांसह ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघात कक्ष उभारण्याबाबत कोणतीही ठोस हालचाल दिसत नाही.

ग्रामीण भागात परिस्थिती आणखी चिंताजनक आहे. शेतकरी, मजूर आणि रोजंदारीवर काम करणारे नागरिक दिवसभर उन्हात काम करत असून त्यांना उष्माघाताचा सर्वाधिक धोका आहे. तरीसुद्धा प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये थंड पाण्याची, आवश्यक औषधांची किंवा प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धता अपुरी असल्याचे चित्र आहे. नागरिकांच्या मते, दरवर्षी उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच प्रशासनाने उष्माघात प्रतिबंधक उपाययोजना सुरू करणे अपेक्षित असते. मात्र यंदा अर्धा उन्हाळा संपूनही कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. परिणामी, 'अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# महावितरण कंपनी हिवरखेड कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा



प्रतिनिधी १९ एप्रिल

**हिवरखेड :** येथील महावितरण कंपनी मध्ये १८ एप्रिलच्या रात्री ८ वाजताच्या दरम्यान शेकडो शेतकऱ्यांनी मोर्चा नेला, महावितरण कंपनीचे अभियंता व मोराडी शेतशिवारातील शेतकऱ्यांची बऱ्याच वेळ बातचीत चालली, शेतकऱ्यांनी महावितरणचे उप अभियंता यांना स्पष्ट सांगितले जिथपर्यंत तुम्ही आमच्या शेतातील विज पुरवठा ८ तास ठेवत ना तिथपर्यंत आम्ही येथून जात नाही.

उप, अभियंता यांनी शेतकऱ्यांच्या लेखी अर्जावर स्वाक्षऱ्या घेऊन मी हा अर्ज वरिष्ठांना पाठवितो या विषयांवर तात्काळ तोडगा काढू तसेच या दरम्यान तात्पुरता वीज पुरवठा सुरूकरण्यात आला.

> आमच्या शेतशिवारातील वीज पुरवठा आठ तास ठेवण्यात यावा या तापमानात वीज कंपनी फक्त ४ तास वीज देत असल्याने आमच्या केळी पिकाचे नुकसान होत आहे.
>
> **विजय गुजर**
> (शेतकरी खंडाळा फीटर शेतशीवार हिवरखेड)

> आम्ही संध्या तात्पुरती वीज सुरू करीत आहोत,८ तासच देऊ परंतु तुमचा लेखी अर्ज तुमच्या स्वाक्षरीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करून पुढील निर्णय घेऊ.
>
> **आशिष धांडे**
> सहाय्यक अभियंता
> महावितरण कंपनी हिवरखेड

## समर्थ पब्लिक स्कूलमध्ये गुणवंतांचा भव्य सत्कार सोहळा

### ◆ गुणांना संस्काराची जोड; विद्यार्थ्यांसह पालक - आजी आजोबांचा सन्मान

प्रतिनिधी १९ एप्रिल



**अकोला:** रिधोरा येथील श्री समर्थ पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये सीबीएसई २०२५-२६ परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमात केवळ गुणवंत विद्यार्थ्यांचाच नव्हे, तर त्यांचे पालक आणि आजी-आजोबांचाही सन्मान करण्यात आला.

रिधोरा येथील श्री समर्थ पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये सीबीएसई परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. 'भिऊ नकोस, ज्ञान, संस्कार आणि प्रगती तुझ्या पाठीशी आहे' या ब्रीदवाक्याला अनुसरून आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या यशाबरोबरच त्यांच्या संस्कारांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना शाल, श्रीफळ, शेला व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांसोबत त्यांचे पालक आणि आजी-आजोबांचाही सत्कार करण्यात आला, ज्यामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि संस्कारमूल्यांची जोड मिळाली. या परीक्षेत श्रेयस सचिन लोखंडे यांनी ९८ टक्के गुणांसह अव्वल स्थान मिळवले. रुद्राक्ष लालबोंद्रे (९७ टक्के), सोहम लोखंडे (९५.७ टक्के), तनिष्का धोरण (९५ टक्के), श्लोक अग्रवाल (९५ टक्के) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत यश मिळवले.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम, कुटुंबातील संस्कार आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला दिले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ऑपरेशन प्रहारमध्ये अकोट ग्रामीण पोलिसांची कारवाई; प्रतिबंधित गुटखा जप्त

वि. प्रतिनिधी १९ एप्रिल



**अकोट :** ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करत एकूण २३,९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १८ एप्रिल २०२६ रोजी ग्राम रूईखेड (ता. अकोट) येथे करण्यात आली.

पोलीस स्टेशन अकोट ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सोमेश श्रीकृष्ण गायगोले हा त्याच्या 'सदगुरु कृपा किराणा' दुकानातून शासनाने बंदी घातलेला पानमसाला व गुटखा विक्री करत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह दुकानावर छापा टाकून कायदेशीर झडती घेतली.

या झडतीत विविध प्रकारचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. त्यामध्ये बाजीराव गोल्ड पानमसाला (८० पाकिटे, किंमत ९,६२० रु.), डोजछाप गुटखा (३० पाकिटे, किंमत ९०० रु.), नजर पानमसाला (१०० पाकिटे, किंमत १२,८०० रु.) तसेच तंबाखूचे २० पाउच (किंमत ६०० रु.) असा एकूण २३,९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वैभव तायडे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर जुनघरे, पोउपनि वैभव तायडे, प्रशांत उज्जैनकर तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने केली.

## महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १९ एप्रिल



**अडगाव बु.:** अडगाव बु. महसूल मंडळातील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर मंडळातील बहुसंख्येने नागरिकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले.. स्थानिक बालाजी मंदिराचे प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा एकचे आमदार प्रकाश भारसाकळे यांचे हस्ते उद्घाटन झाले.

यावेळी सोसायटी अध्यक्ष मनोहरलाल फाफट, माजी जिप सदस्य डॉ. मनमोहन व्यास, गोपाल कोल्हे, प्रशासक शोभा खंडारे,संजय राजनकर, उमेश पवार, तहसीलदार महेश रामगुंडे, नायब तहसीलदार विकास राणे, ज्योती नारगुंडी, पुरवठा निरीक्षक कावरे, मंडळ अधिकारी सुधाकर सोनोने,उप अधीक्षक भुमी अभिलेख बिहाडे, सहदुय्यम निबंधक ए आर चव्हाण, गटविकास अधिकारी अनिल बांगर, ग्राम महसूल अधिकारी प्रवीण देशमुख, ग्राम विकास अधिकारी अनिल खुमकर,महसूल सेवक सुनील सोळंके, महसूल मित्र गजानन निमकर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध विभागांकडून २६९ प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमांचे प्रास्ताविक तहसीलदार महेश रामगुंडे यांनी संचालन सहायक कृषी अधिकारी मनोज सारभुकन,तर आभार प्रदर्शन शेख जमिर यांनी केले


## केशव दिव्यांग महिला संस्थेद्वारे महामानवांना अभिवादन

**अकोला:** दिव्यांग वर्गात सेवा करणाऱ्या महिलांच्या केशव दिव्यांग महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी केली. संस्थेच्या अध्यक्षा तथा राष्ट्रीय रेल्वे प्रवासी महिला संघटना दिव्यांग आघाडीच्य विदर्भ अध्यक्ष मनीषा खेडकर यांच्या अध्यक्षतेत व प्रमुख पाहुणे सुमित्राताई, नवलेताई, सौ भटकर यांच्या उपस्थितीत संपन्न या जयंती सोहळ्यात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली.

## कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये २० व २१ एप्रिल रोजी विशेष कँपचे आयोजन

### ◆ कोणत्याही व्याधीपासून काही मिनिटांत सुटकेचा दावा

प्रतिनिधी १९ एप्रिल



**अकोला:** आजच्या गतिमान युगात प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या व्याधीने त्रस्त आहे. महागडी औषधे घेऊनही अनेक रुग्णांना आराम मिळत नाही. स्नायू, सांधे, गुडघे, कंबरदुखी इत्यादी त्रासाने त्रस्त असलेल्या रुग्णांना तात्काळ आराम मिळवून देण्यासाठी, शहरातील 'कमाल वेदना निवारण केंद्र' मध्ये २० आणि २१ एप्रिल रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

नॅचरोपॅथी, ॲक्युथेरपी आणि कायरोप्रॅक्टिक उपचार पद्धतीनंतर कमाल वेदना निवारण केंद्रामध्ये फक्त पंधरा ते वीस मिनिटांत वेदनेतून आराम मिळतो, असा दावा आग्रा येथील सुप्रसिद्ध बी.ई.एम.एस. नेचरोपॅथी व कायरोप्रॅक्टिक तज्ज्ञ डॉक्टर तरुण यादव आणि थेरपिस्ट डॉ. उदेन खान यांनी केला आहे.

गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, मणक्याच्या हाडामध्ये गॅपमुळे होणारी वेदना, हात-पायांना मुंग्या येणे, पायात पेटके येणे, मायग्रेनचा त्रास, छातीत दुखणे, पायांची जळजळ, अंगदुखी, मणक्याच्या हाडात गॅप, हात उचलता न येणे, हातामध्ये पेटके येणे किंवा शरीरात कोठेही वेदना असल्यास, या सर्व जुन्या



दुखण्यांपासून मुक्ती मिळते. डॉ. तरुण यादव यांच्या मदतीने येथे एक ते दहा वर्षांपर्यंतच्या जुन्या वेदनेपासून केवळ १५ ते २० मिनिटांत पूर्णपणे आराम मिळू शकतो.

आतापर्यंत डॉ. तरुण यादव यांनी शेकडो रुग्णांवर उपचार करून त्यांना रोगमुक्त केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल अनेक मोठे राजकारणी, उद्योगपती आणि सामाजिक संघटनांनी त्यांचा सत्कार केला आहे.

२० आणि २१ एप्रिल रोजी आयोजित कँपचा लाभ घेण्याचे आवाहन रुग्णांना करण्यात आले आहे. महिलांसाठी येथे स्वतंत्र व्यवस्था आहे आणि ऑनलाईन नोंदणीची सोय देखील उपलब्ध आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी कमाल वेदना मुक्त केंद्र मंगरूळपीर रोड, युसुफ अली खदान गणेश शटरच्या बाजूला तसेच कृपया ८६२३८८८४४३ आणि ९०२१९३३९३५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

## आलेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र जवळील थ्री फेज रोहित्र सुरू करा

### ◆ माजी उपसभापती इमरान खान यांची मागणी

प्रतिनिधी १९ एप्रिल



**आलेगाव :** आलेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बाजूला असलेली थ्री फेज रोहित्र तात्काळ सुरू करण्यासाठी पातूर पंचायत समितीचे माजी उपसभापती इमरानखान मुमताजखान यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता यांचेकडे निवेदन दिले.

प्राथमिक आरोग्य केंद्र जवळील रोहित्र हे थ्री फेज रोहित्र मंजूर असून हे रोहित्र गेल्या काही दिवसांपासून थाटात उभे आहे परंतु ते अद्याप पावेतो सुरू झाले नाही. विद्युत पुरवठा व्यवस्थित मिळू शकत नसल्यामुळे रुग्णाची हेडसांड होत आहे. तसेच सदर परिसरामध्ये छोटे उद्योजक असल्यामुळे त्यांना थ्री फेज रोहित्र असणे गरजेचे आहे. वरील समस्या मार्गी लावण्यासाठी सदर रोहित्र तात्काळ सुरू करावे या करीता इमरान खान मुमताज खान यांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदना द्वारे मागणी केली असून निवेदनावर वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्षा सौ अर्चना डाबेराव आणि इमरान खान यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सोनोरी गावात मशीद परिचय कार्यक्रम

### ◆ हिंदू - मुस्लिम ऐक्याचा अनोखा संदेश

प्रतिनिधी १९ एप्रिल



**मुर्तीजापूर :** सोनोरी गावात आयोजित मशीद परिचय कार्यक्रमाला हिंदू बांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. 'हम सब का मालिक एक है' आणि 'गर्व से कहो हम सब एक है' या संदेशातून कार्यक्रमाने एकता, बंधुता आणि सामाजिक सलोखा यांचा प्रभावी संदेश दिला. सध्या काही स्वार्थी राजकीय घटकांकडून हिंदू-मुस्लिम नावावर मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना, अशा सकारात्मक उपक्रमांमुळे समाजात ऐक्य आणि शांततेची भावना दृढ होत असल्याचे चित्र येथे पाहायला मिळाले. या कार्यक्रमात मुफ्ती रोशन शाह कासमी यांनी इस्लाम धर्म आणि मोहम्मद पैगंबर यांच्या शिकवणीवर प्रकाश टाकत सांगितले की, आपण सर्वजण एका परमेश्वराची उपासना करतो, त्यामुळे आपण सर्व भाऊ-भाऊ आहोत. त्यांनी प्रेम, शांतता आणि आपुलकीचा संदेश देत समाजात सौहार्द टिकवण्याचे आवाहन केले.

मो. इश्तियाक (माना) यांनीही संत-महात्म्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजोपयोगी कार्य करण्याचे आवाहन केले. हिंदू बांधवांनीही विचार मांडत इस्लाम आणि पैगंबरांच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊन एकता आणि बंधुता मजबूत करण्याची गरज व्यक्त केली. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते अहमद खान उर्फ अम्मू आणि पोलिस पाटील बासिद पटेल यांनी केले होते. कार्यक्रमात खिरखुरमा वाटपही करण्यात आले. या प्रसंगी कमलाकर गावंडे, श्रीकृष्ण गावंडे, भुजंगराव येदवर, हेड कॉन्स्टेबल अनिल राठोड, नगरसेवक सचिन देशमुख, नंदकिशोर रावत, भूषण कोकाटे, शेख इमरान, शेख खलील, अनवर खान, पिंकू शर्मा, प्रकाश तायडे, राजू गोडसे, सुरेश शिकरे, श्रीराम भारगवे, आकाश वानखेडे, सुहास खांडेकर, नाजूक इंगळे, बालू शेंदूरकर, समाधान मोहल्ले, उज्ज्वल ठाकरे, समीर शर्मा, अनीश चौस, इस्माईल शाह, राजू जोगदंड, जनार्दन लोहीकपुरे, शंकर रुमाले, मुजम्मिल खान, युनूस शाह, अब्दुल मतीन, मो. इरफान, माजी सरपंच सुमित राऊत, मौलाना व इतर मान्यवरांसह गावातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :

- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.

- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# गादी पिंजनालयाला भीषण आग; लाखांचे नुकसान





प्रतिनिधी १९ एप्रिल

**यवतमाळ :** शहरातील अप्सरा टॉकीजलगत असलेल्या गादी पिंजनालयाला शनिवारी दुपारी सुमारे दीडच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत पिंजनालयातील कापूस, मशिनरी, तयार माल तसेच एक वाहन जळून खाक झाले असून सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

अब्दुल नसिर अब्दुल रऊफ यांचे या परिसरात गादी पिंजनालय व गोदाम आहे. दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. पिंजनालयात मोठ्या प्रमाणात कापूस व अन्य ज्वलनशील साहित्य साठवलेले असल्याने आगीने काही क्षणातच भीषण रूप धारण केले. धुराचे लोट दूरवरून दिसत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच नगरपरिषदेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळविले.

या आगीत कापसाच्या गाठी, मशिनरी, तयार माल आणि एक वाहन पूर्णतः जळून खाक झाले. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे.

आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, विद्युत शॉर्टसर्किट किंवा अन्य कारणांमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# पीक विम्याच्या मदतीपासून शेतकरी वंचित राहू नये

## पालकमंत्री राठोड यांची कृषी मंत्र्यांशी चर्चा

प्रतिनिधी १९ एप्रिल

**यवतमाळ :** राज्यात गेल्यावर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले होते. पंतप्रधान पीक विमा योजनेतून 1,219 कोटी रुपयांची भरपाई जाहीर करण्यात आली होती. यामध्ये अनेक जिल्ह्यांचे नाव समाविष्ट होते, पण यवतमाळ जिल्ह्याचे नाव त्या यादीत दिसत नव्हते. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आणि ते वंचित राहू नयेत यासाठी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री संजय राठोड यांनी तातडीने या समस्येवर लक्ष केंद्रित केले. सदर समस्या तांत्रिक कारणांमुळे झाली असून, पोर्टलवर काही कागदपत्रे अपलोड करण्यात त्रुटी झाल्या आहेत. यवतमाळ जिल्ह्याच्या पीक विमा साठ्यावर शून्य दर्शवले जात आहे, पण ती फक्त तांत्रिक बाब आहे. याबाबत प्रशासनाने युद्धपातळीवर काम सुरू केले आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे आणि प्रधान सचिव परिमल सिंह यांच्याशी चर्चा केली असून, त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

यवतमाळ जिल्ह्यात सोयाबीन हे मुख्य पीक आहे आणि सुमारे 2.5 ते 2.65 लाख हेक्टरवर याची लागवड केली जाते. मोठ्या संख्येने शेतकरी पंतप्रधान पीक विमा योजनेत सहभागी झाले आहेत, मात्र सोयाबीन उत्पादनाच्या नुकसान भरपाईसाठी यवतमाळ जिल्ह्याचे नाव न लागल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील 110 महसूल मंडळांपैकी 75 मंडळांमधील नुकसान भरपाईची परिगणना पूर्ण झाली होती. 'पीएमएफबीवाय' पोर्टलवर जिल्ह्यासाठी 252 लक्ष रुपयांची मदत मंजूर झाल्याचे दिसत होते, मात्र काही कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करताना चुकलेल्या त्रुटीमुळे ही रक्कम शून्य दिसत होती. याबाबत कृषी विभागाने तांत्रिक अडचणी दूर करण्याचे कार्य सुरू केले आहे.

पालकमंत्री राठोड यांनी जिल्ह्यातील 35 महसूल मंडळांची आकडेवारी विमा कंपनीकडे प्रलंबित असल्याची माहिती दिली. ते लवकर पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या नुकसानीची



पूर्ण भरपाई होईल, यासाठी सर्व संबंधित विभागांनी तातडीने कागदपत्रांची पूर्तता करावी, असे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

"शेतकऱ्यांना पीक विमा मदतीपासून वंचित राहू नये यासाठी स्थानिक प्रशासनाने सर्व प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण कराव्यात. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची काटेकोर तपासणी करून, कागदपत्रांची पूर्तता त्वरित केली जाईल." असेही पालकमंत्री संजय राठोड म्हणाले.

## आगीत शेतातील गोठा जळून खाक

प्रतिनिधी १९ एप्रिल

**राळेगाव :** तालुक्यात येत असलेल्या रिधोरा येथे गोठ्याला लागलेल्या आगीत शेतीसाहित्यासह कापूस, रासायनिक खताच्या बॅग जळून खाक झाल्या. विष्णुजी महाजन यांच्या शेतात असलेल्या गोठ्याला आग लागली. गोठ्यातून धूर निघताना दिसताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळाच्या दिशेने धाव घेतली. त्यांनी आपापल्या परिने आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. या घटनेत महाजन यांचे नुकसान झाले.

# उमरखेडमध्ये बँकांमध्ये रोकड टंचाई; ग्राहकांचे व्यवहार विस्कळीत

प्रतिनिधी १९ एप्रिल

**उमरखेड :** तालुक्यातील राष्ट्रीयकृत बँकांमध्ये गेल्या काही दिवसांपासून रोकड टंचाई जाणवत असून, याचा थेट परिणाम ग्राहकांच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर होत आहे. स्वतःच्या खात्यातील रक्कम काढण्यासाठी बँकेत येणाऱ्या नागरिकांना अनेकदा 'कॅश उपलब्ध नाही' असे सांगून परत पाठविले जात आहे. कडाक्याच्या उन्हातही ग्राहक बँकांमध्ये गर्दी करत आहेत.

विड्रॉल स्लिप भरल्यानंतर कॅशियरकडून रक्कम नसल्याचे कळत असल्याने नागरिकांना निराश होऊन परतावे लागत आहे. 10 ते 50 हजार रुपयांपर्यंतची रक्कम काढण्यासाठीही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक नियोजन करताना अडथळे येत आहेत. तालुक्यातील स्टेट बँक, सेंट्रल बँक, महाराष्ट्र बँक तसेच ग्रामीण भागातील इतर राष्ट्रीयकृत बँकांमध्येही अशीच परिस्थिती असल्याची माहिती मिळते. याबाबत शाखा व्यवस्थापक प्रदीप फटींग यांनी सांगितले, "सध्या बँकेत सोमवारपर्यंत पुरेल एवढीच रोकड उपलब्ध आहे. आज 50 हजारांपर्यंतचे विड्रॉल दिले जात आहेत."

दरम्यान, परिस्थिती सुधारण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना करावी, अशी अपेक्षा ग्राहकांकडून व्यक्त होत आहे.

# अर्धवट रस्त्यांच्या कामांवरून आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १९ एप्रिल

**उमरखेड :** शहरासह तालुक्यातील अर्धवट ठेवलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, ही कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावीत, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी दिला आहे.

यासंदर्भात संजय पळसकर यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात शहर व तालुक्यातील अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवले असून, त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत



असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पावसाळा तोंडावर असताना ही कामे अपूर्ण राहिल्यास रस्त्यांवर चिखल व पाणी साचून अपघातांची शक्यता वाढू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच, जीवितहानी झाल्यास संबंधित बांधकाम विभाग जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. शहरातील आंबेडकर पुतळा ते संजय गांधी चौक हा रस्ता गेल्या सहा महिन्यांपासून खोदून ठेवण्यात आला असून, पावसाळ्यात येथे पाणी साचून तलावाचे स्वरूप निर्माण होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकातही अशीच परिस्थिती असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

काही ठिकाणी सिमेंट रस्त्याच्या बाजूला मातीमिश्रित मुरूम टाकण्यात येत असल्याचा आरोप करत, या कामांच्या गुणवत्तेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणी तातडीने लक्ष घालून सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा शिवसेना (उबाठा) तर्फे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# एचटीबीटी कापसाच्या मंजुरीसाठी खासदारांचे दिल्लीत आंदोलन

प्रतिनिधी १९ एप्रिल

**यवतमाळ :** तणनाशक सहनशील व कीड प्रतिरोधक एचटीबीटी कापसाला तातडीने मंजुरी द्यावी, या प्रमुख मागणीसाठी विदर्भातील खासदारांनी दिल्लीत आंदोलन छेडले. यामध्ये खासदार संजयभाऊ देशमुख (यवतमाळ-वाशीम), रविंद्र चव्हाण (नांदेड), प्रतिभाताई धानोरकर (चंद्रपूर-आर्णी) आणि डॉ. प्रशांत पडोळे (भंडारा-गोंदिया) सहभागी झाले होते. जिएम पिकांच्या क्षेत्रीय चाचण्यांसाठी राज्यांच्या 'ना हरकत प्रमाणपत्र' अटी रद्द कराव्यात, तसेच अप्रमाणित एचटीबीटी बियाणे वापरणाऱ्या शेतकऱ्यांवर कारवाई करू नये, अशा मागण्याही यावेळी करण्यात




आल्या.

या आंदोलनात मिलिंद दामले, विजय निवल, दीपक आनंदवार आणि राजेंद्र झोटींग यांसह विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी एचटीबीटी कापूस, मका व सोयाबीन लागवडीला परवानगी देणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

भारताचा कापूस क्षेत्र सध्या मोठ्या आव्हानांना सामोरे जात आहे. उत्पादकता टिकवून ठेवणे, खर्च कमी करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे यासाठी नव्या तंत्रज्ञानाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. अमेरिका, ब्राझील आणि अर्जेंटिना यांसारख्या देशांमध्ये एचटी कापूस मोठ्या प्रमाणावर वापरला जात असून, त्यातून उत्पादनवाढीला चालना मिळाली आहे. भारतात 2002 पासून बीटी कापूस वापरात असला तरी त्यानंतर तंत्रज्ञानात मोठी प्रगती झालेली नाही. तण व्यवस्थापन हे कापूस शेतीसमोरील मोठे आव्हान असून, तणांमुळे उत्पादनात 40 ते 60 टक्क्यांपर्यंत घट येते. मजुरांची टंचाई आणि वाढते खर्च यामुळे पारंपरिक पद्धतीने तण नियंत्रण करणे कठीण झाले आहे. जागतिक स्तरावर कापसाची उत्पादकता सुमारे 22 क्विंटल प्रति हेक्टर असताना भारतात ती केवळ 13 क्विंटल प्रति हेक्टर आहे. ही तफावत दूर करण्यासाठी एचटीबीटी कापूस महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो. या तंत्रज्ञानामुळे तण नियंत्रण सुलभ होऊन उत्पादनवाढीस मदत होईल, तसेच शेती अधिक शाश्वत व किफायतशीर होईल, असा विश्वास आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.

# महिलेवर दगडाने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १९ एप्रिल

**उमरखेड :** तालुक्यातील चिल्ली (ज) येथे शेजाऱ्यांतील वादातून एका महिलेवर दगडाने हल्ला केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी चौघांविरुद्ध उमरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१७ एप्रिल रोजी रात्री साडेआठच्या सुमारास फिर्यादी सुनिता पवार यांच्या घरासमोर उभे राहून आरोपी अशोक जाधव व त्याचा भाऊ किशोर जाधव हे दारूच्या नशेत शिवीगाळ करत होते. याबाबत जाब विचारण्यासाठी सुनिता पवार बाहेर आल्यावर दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढताच किशोर जाधव याने भांडण सुरू केले, तर अशोक जाधव याने सुनिता पवार यांच्या कानशिलात चापट मारून रस्त्यावरचा दगड कपाळावर मारला, ज्यामुळे त्या जखमी झाल्या. तसेच, "घरातील सर्वांना ठार मारू" अशी धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, अशोक जाधव याची पत्नी ज्योत्स्ना जाधव व आई पार्वती जाधव यांनीही शिवीगाळ करत सुनिता पवार यांचे केस ओढून मारहाण केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी उमरखेड पोलिसांनी अशोक जाधव, किशोर जाधव, ज्योत्स्ना जाधव आणि पार्वती जाधव यांच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# अनाथ मुलींच्या विवाहासाठी ५ लाखांची तरतूद करा

प्रतिनिधी १९ एप्रिल

**आर्णी :** अनाथ मुलींच्या विवाहासाठी प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक तरतूद करावी तसेच 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थ्यांना ई-केवायसीसाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख डॉ. विष्णू उकंडे यांनी केली आहे. त्यांनी माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि यवतमाळचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

ठाण्यातील निवासस्थानी तसेच मुंबईतील 'शिवनेरी' येथे झालेल्या भेटीत उकंडे यांनी यवतमाळ जिल्ह्यातील अनाथ मुलींच्या विवाहाचा



प्रश्न गंभीर बनत असल्याचे निदर्शनास आणून दिले. आई-वडिलांचे निधन किंवा बेपत्ता होण्याच्या घटनांमुळे अनेक मुली अनाथ झाल्या असून त्यांच्या विवाहासाठी इच्छुक पुढे येत नसल्याची स्थिती त्यांनी मांडली. त्यामुळे अशा मुलींच्या विवाहासाठी शासनाने प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्याची योजना राबवावी, अशी त्यांनी मागणी केली.

तसेच 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेचा लाभ अनेक महिलांना झाला असला, तरी काही लाभार्थी ई-केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करू शकल्या नाहीत. अशा महिलांना योजनेपासून वंचित राहू नये म्हणून ई-केवायसीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशीही मागणी उकंडे यांनी केली. यावर शिंदे आणि राठोड यांनी निवेदनाची दखल घेत सकारात्मक भूमिका दर्शवली असून अनाथ मुली व महिलांच्या हितासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिल्याचे उकंडे यांनी सांगितले.

## ग्रामपंचायत माथार्जुन

# सरपंच पोटनिवडणुकीत तिरंगी लढतीचे चित्र स्पष्ट

प्रतिनिधी १९ एप्रिल

योगेश मडावी

**झरी जामणी :** ग्रामपंचायत माथार्जुन येथील थेट सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीने आता चुरशीचा रंग घेतला आहे. निवडणूक प्रक्रियेला ७ एप्रिल २०२६ पासून सुरुवात झाली असून १३ एप्रिल रोजी एकूण चार उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

मात्र १५ एप्रिल रोजी झालेल्या छाननीत भागीरथा शंकर आत्राम यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात आला. त्यामुळे तीन उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून सरपंचपदासाठी तिरंगी लढत निश्चित झाली आहे. निर्मला जपलत कुमरे, प्रेमिला पुडलिक मेश्राम आणि उज्वला संतोष तुमराम यांच्यात सरपंच पदासाठी थेट मुकाबला होणार आहे. गावात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून तिन्ही उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे.

या चुरशीच्या लढतीकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्ष लागले असून पुढील राजकीय घडामोडींकडे सर्वांचेच लक्ष केंद्रित झाले आहे.

# स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त गुरुचरित्र पारायण

प्रतिनिधी १९ एप्रिल

**पुसद :** शहरातील सप्तगिरी नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ९ ते १५ एप्रिल दरम्यान अखंड स्वामीनाम जप यज्ञ सप्ताह तसेच सामूहिक गुरुचरित्र पारायण सोहळा उत्साहात पार पडला.

या सामूहिक पारायणात एकूण १६४ सेवेकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

सप्ताह काळात अखंड स्वामीनाम जप, विना वादन, तसेच गणेश याग, गीताई याग, चंडी याग, स्वामी याग, रुद्र याग आणि मल्हारी याग यांसारखे विविध धार्मिक विधी पार पडले.

दररोज नित्यस्वहाकार, त्रिकाल आरती, सायंकाळी औदुंबर प्रदक्षिणा, विष्णुसहस्त्रनाम आणि पसायदान यांचेही आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमात महिला व पुरुष सेवेकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पुण्यतिथी सप्ताहानिमित्त बुधवारी आयोजित महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रातील सदस्यांनी पुढाकार घेतला.

# नगरसेवक अशपाक शेख यांची वेगळी कार्यशैली ठरतेय लक्षवेधी

प्रतिनिधी १९ एप्रिल

**आर्णी :** प्रभाग क्रमांक ५ चे नगरसेवक अशपाक शेख हे आपल्या वेगळ्या कार्यपद्धतीमुळे सध्या चर्चेत आले आहेत. दररोज सकाळी लवकर प्रभागात फिरून नागरिकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेणे, ही त्यांची कार्यशैली ठळकपणे दिसून येते.

नागरिकांच्या अडचणी समजून घेत तातडीने उपाययोजना करण्यावर त्यांचा भर असतो. कोणतीही समस्या प्रलंबित राहू नये, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यामुळे अल्पावधीतच त्यांनी नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.



नगरसेवक पदावर असूनही त्यांनी कधीही पदाचा गर्व न करता साधेपणाने काम केले आहे. सर्वसामान्य नागरिकांमध्ये मिसळून सेवा देण्याची त्यांची भूमिका विशेष ठरत आहे.

सर्वधर्मसमभाव जपत सर्व धर्मीय नागरिकांना समान वागणूक देत एकोपा आणि बंधुता टिकवण्याचा प्रयत्न ते करत आहेत. दिवस असो वा रात्र, नागरिकांसाठी सहज उपलब्ध राहून समस्यांवर तत्काळ तोडगा काढण्यावर त्यांचा भर आहे.

प्रामाणिक कामगिरीच्या जोरावर प्रभाग क्रमांक ५ मध्ये त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, नागरिकांच्या मनात विश्वासार्ह नेतृत्व म्हणून स्थान मिळवले आहे.

# सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## उद्यापर्यंत उष्णतेची लाट कायम

**अमरावती :** उद्यापर्यंत आणखीन उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचे हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांनी सांगितले. अफवांपासुन सावधान राहण्याचा सल्ला त्यांनी दिला. पश्चिमी चक्रवात काश्मीर च्या थोडा पुढे गेला आहे.

पंजाब आणि आसाम वर चक्राकार वारे वाहत आहेत. विदर्भ ते दक्षिण भारत कमी दाबाची द्रोणीय स्थिती आहे. अरबी समुद्रातून बाष्पयुक्त वारे मध्य भारताकडे येत आहे. त्यामुळे तापमान हळूहळू कमी होईल. आज उद्या विदर्भात कमाल तापमान ४४ ष्ट च्या आसपास राहिल. २० तारखेपासून उष्णतेची लाट संपुष्टात येईल. विदर्भात २०,२१,२२ ऐप्रील तुरळक ठिकाणी हलक्या फुलक्या पावसाची शक्यता गडगडाटासह आहे. महाराष्ट्रात २०-२२ तारखेला हाहाकार होईल अशी अफवा काही भोंदू हवामान तज्ञ आणि त्यांच्याशी संबंधित चॅनेल पसरवत आहे.

## समतापर्व म्हणजे फुले - शाहू - आंबेडकरांच्या विचारांचा जागर- आ. सुलभा खोडके

### ◆ वैचारिक परिवर्तनासाठी तपोवन परिसरात 'समतापर्व' उत्साहात साजरे

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अमरावती:** समता, न्याय, आणि बंधुतेचा संदेश घराघरापर्यंत भारतीय संविधान जागृती आणि समतेच्या विचारांच्या प्रसारासाठी समतापर्व साजरा साजरा केला जातो. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारातून समताधिष्टित समाज घडविण्यासाठी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला लोकशाही समाज निर्माण करण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. समतापर्व म्हणजे फुले -शाहू- आंबेडकरांच्या विचारांचा जागर असून त्यांच्या जाणिवेसोबतच स्वयंप्रत अंगीकृत करून अनुसरण करण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सुलभाखोडके यांनी केले.



समता महिला मंडळ तपोवन अमरावती व गोदावरी हाऊसिंग सोसायटी योगीराज नगर अमरावतीच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्य ११ ते १७ एप्रिल पर्यंत समतापर्वचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी उपस्थित राहून वैचारिक पुष्प गुंफतांना फुले -शाहू- आंबेडकर यांच्या विचारातून पुरोगामी महाराष्ट्राची जडण-घडण झाली असल्याचे सांगितले. महात्मा फुले यांनी विषमतेवर कडा प्रहार करून जो समतावादी विचार मांडला. त्यांचे प्रतिबिंब व महत्व आज भारतीय संविधानात अधोरेखित झाले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवतावादी मूल्यांची मशाल तेजाने पेटवण्यासाठी समतापर्व च्या माध्यमातून वैचारिक भीम जयंती साजरी होणे आजची गरज असल्याचे सुद्धा आ. सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले. यावेळी प्रभागाचे नगरसेवक प्रमोद महल्ले व नगरसेविका सौ. मीनलताई योगेश सवाई देखील उपस्थित होते. या पाचदिवसीय समता पर्व कार्यक्रमात वेशभूषा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा , सांस्कृतिक कार्यक्रम सामाजिक प्रबोधन, परिवर्तन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. तसेच संदीपपाल महाराज यांचा बुद्ध-भीम गीतांचा कार्यक्रमातुन नागरिकांमध्ये उत्साहाची लाट उसळली होती. संदीपपाल महाराज यांनी आपल्या मुखवाणीतून अंधश्रद्धा, भोंदूपणा,जाती प्रथा अशा विषयांवर घणाघात करून सामाजिक समरसतेचा संदेश दिला. पाचदिवस चाललेल्या समतापर्व उत्सवाचा बक्षीस वितरण व सत्कार समारंभाने समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात राजेंद्र खोरगडे, देवेंद्र पवार ,गौतम वानखडे , रवी वानखडे ,नरेंद्र गुलदेवकर, सुधीर गाडे, नरेंद्र वानखडे राहुल खंडारे, दिनेश वानखडे, गजानन मनोहरे, तसेच वनिता धावणे ,वैशाली खंडारे,रंजनाताई हरले,अर्चना मनोहरे, गुंफा उके ,सोनू वंजारी, रीना वानखडे, आदींसह समता महिला मंडळ तपोवन अमरावती व गोदावरी हाऊसिंग सोसायटी योगीराज नगर अमरावती येथील महिला -पुरुष व युवक बांधवानी अथक परिश्रम घेतले.

## जिल्ह्यात महावितरणच्या भरारी पथकाची कारवाई

### ♦ वर्षभरात ३२० वीज चोरी प्रकरणांचा भांडाफोड; ५.८५ कोटींची वीज चोरी उघड

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अमरावती:** जिल्ह्यातील वीज चोरी रोखण्यासाठी महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या भरारी पथकाने वर्षभरात प्रभावी कारवाई करत ३२० वीज चोरी प्रकरणांचा भांडाफोड केला आहे. उपकार्यकारी अभियंता श्रीकांत तळेगावकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक अभियंता शंकर राऊत व सहकाऱ्यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवली.



जिल्ह्यात महावितरणच्या भरारी पथकाने विविध ठिकाणी धाडी मारत केलेल्या कारवाईत ३३ लाख २५ हजार ६०३ युनिट वीज चोरी झाल्याचे उघड झाले असून, त्याची किंमत सुमारे ५ कोटी ८४ लाख ६७ हजार रुपये इतकी आहे. महावितरणसाठी हा मोठा आर्थिक तोटा ठरू शकला असता, मात्र भरारी पथकाच्या सतर्कतेमुळे हे प्रकार वेळेत उघडकीस आले. महावितरणने ३२० पैकी २९८ प्रकरणांमध्ये तडजोडीची संधी देत ५ कोटी ४ लाख रुपयांची वसुली केली आहे. मात्र अद्याप २२ प्रकरणांमध्ये ८१ लाख ६३ हजार रुपयांची वसुली बाकी असून ती वसूल करण्यासाठी पुढील कारवाई सुरू आहे. या मोहिमेत ३२ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच कलम १२६ आणि इतर तरतुदींनुसार ९१ प्रकरणांवरही कारवाई करण्यात आली आहे. भरारी पथकाने जिल्ह्यात संशयासस्पद ठिकाणी छापे टाकले असता २२९ ठिकाणी थेट वीज चोरी होत असल्याचे आढळले. तपासादरम्यान वीज चोरीचे अनेक प्रकार उघड झाले. यामध्ये मीटरमधील वायर कापणे, मीटर बंद करणे, फ्लॅश प्रणाली निष्क्रिय करणे, मीटरला छिद्र पाडून त्यामध्ये रोधक निर्माण करणे तसेच मीटर बायपास करून थेट वीज वापरणे अशा पद्धतींचा समावेश आहे.


## बयाण, पुरावे देण्यासाठी पिडीतांनी पुढे यावे - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### ♦ परतवाडा प्रकरणी सखोल चौकशी करून गुन्हा सिद्ध करणार

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अमरावती :** परतवाडा येथील एका युवकाने असंख्य महिलांशी गैरवर्तन करून त्याचे व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित केले आहे. याबाबत पोलिसांनी पुढाकार घेऊन गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये पिडितांनी बयाण आणि पुरावे देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

पालकमंत्री बावनकुळे यांनी आज जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयाला भेट देऊन याप्रकरणी सविस्तर माहिती जाणून घेतली. यावेळी आमदार प्रवीण तायडे, आमदार प्रताप अडसड, महापौर



श्रीचंद तेजवानी, तुषार भारतीय, चेतन पवार, पोलीस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद आदी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे यांनी याप्रकरणी अद्यापपर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सात मोबाईल, एक टॅब, लॅपटॉप, हार्ड डिस्क ताब्यात घेतली आहे. याची फॉरेन्सिक तपासणीसाठी करण्यात येत आहे. याप्रकरणी आरोपींनी सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल केली आहेत. त्यांचे प्रसारण थांबवण्यासाठी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. याप्रकरणी एक पंधरा वर्षीय पिडीत मुलगी बयाण देण्यासाठी पुढे आले आहे. याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येत आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस आणि विशेष तपास पथक काळजीपूर्वक तपास करीत आहे. याबाबत जिल्हा आणि राज्यस्तरावर दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. पोलिसांनीही गुन्ह्याचे सर्व पैलू तपासून यातील आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करीत आहे. आरोपींना शिक्षा होईल यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

परतवाडा येथील प्रकरणी माध्यमांमध्ये विविध वृत्त येत आहेत. त्यामुळे याप्रकरणी पीडित बयाण देण्यासाठी पुढे येण्यास समस्या निर्माण होऊ शकत असल्यामुळे माध्यमांनीही सजगपणे वार्तांकन करावे. तसेच धर्मांमध्ये तेढ निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडू नये, तसेच तपास भरकटू नये यासाठी प्रयत्न करावे.

## आझाद समाज पार्टीची अमरावती येथील सभा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अमरावती :** येथील शासकीय विश्रामगृहामध्ये १८ एप्रिल २०२६ रोजी आझाद समाज पार्टीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मनीष साठे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत आगामी निवडणुका आणि संघटन मजबुतीकरणावर भर देण्यात आला. प्रमुख उपस्थिती (पदाधिकारी) सभेला महाराष्ट्र राज्य आणि विदर्भातील अनेक दिग्गज पदाधिकारी उपस्थित होते:

प्रदेश पातळी: सिद्धार्थ देवरे (प्रदेश उपाध्यक्ष), प्रा. प्रमोद मेश्राम (प्रवक्ता), सुदाम बोरकर (महाराष्ट्र सचिव).

विदर्भ व जिल्हा पातळी: उमेश



हिवराळे (पश्चिम विदर्भाध्यक्ष), रवींद्र फुले (पश्चिम विदर्भ उपाध्यक्ष), उमेश दुर्योधन (पूर्व अमरावती अध्यक्ष), प्रवीण मोहोड (पश्चिम अमरावती अध्यक्ष), रविभाऊ हजारे (जिल्हा सचिव).

स्थानिक व युवा नेतृत्व: नितीन काळे (शहर युवा अध्यक्ष), अशोक इंगोले (शहर संघटक), स्वप्निल खडसे (तालुकाध्यक्ष, नांदगाव खंडेश्वर), सिद्धार्थ दामोधरे (शहर मीडिया प्रभारी), सुशील वानखडे (तिवसा विधानसभा अध्यक्ष), अक्षय पांडे (मोर्शी तालुकाध्यक्ष).

**मेळघाट विभाग:** सय्यद आणिस सय्यद उस्मान (शहराध्यक्ष, धारणी), मोहम्मद अफजल अब्दुल रजाक (शहर उपाध्यक्ष, धारणी).

**इतर मान्यवर:** अंकुश आठवले, ज्ञानेश्वर गडलिग, अतुल गायगोल आणि अनेक सक्रिय कार्यकर्ते.

,सभेतील महत्त्वाचे निर्णय आणि ठराव सभेमध्ये पक्षाच्या भविष्यातील वाटचालीसाठी खालील महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले:

**नेतृत्व बळकटीकरण:** ॲड. भाई चंद्रशेखर आझाद यांचे विचार जनमानसापर्यंत पोहोचवून त्यांचे हात मजबूत करण्याचा निर्धार सर्वानुमते करण्यात आला.

**नवीन नियुक्ती:** सुरजभाऊ रत्नाकर बीसांद्रे यांची वरुड तालुका अध्यक्ष म्हणून अधिकृत निवड करण्यात आली व त्यांच्यावर तालुक्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

**निवडणूक रणनीती:** आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी पूर्ण ताकदीनिशी उमेदवार उभे करण्याचा आणि विजयासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## दर्यापूर शहरातील आठवडी बाजारात चोरीच्या घटनांबाबत तातडीने उपाययोजना कराव्या

### ◆ भाजप युवा मोर्चाचे निवेदन

प्रतिनिधी १९ एप्रिल

**दर्यापूर:** शहरात गेल्या काही दिवसांपासून गुरुवारी भरणाऱ्या आठवडी बाजारामध्ये मोबाईल फोन, दुचाकी आणि इतर मौल्यवान वस्तूंच्या चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. नुकत्याच समोर आलेल्या घटनांनुसार, एकाच दिवसात आठवडी बाजारातून अनेक नागरिकांचे मोबाईल फोन चोरीला गेले आहेत. तसेच शहरातील विविध भागांतून दुचाकी चोरीला गेल्या आहेत. या वाढत्या चोऱ्यांमुळे सामान्य जनता, व्यापारी आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरटे गर्दीचा फायदा घेऊन सर्वसामान्यांचे मोठे आर्थिक नुकसान करत आहेत.



यासंदर्भात पोलीस गस्त वाढवावी,बाजार परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी आणि चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून त्यावर देखरेख ठेवली जावी या चोरीच्या प्रकरणांचा तातडीने तपास लावून गुन्हेगारांना जेरबंद करावे तसेच पोलीस प्रशासनातर्फे सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना सतर्क राहण्याबाबत सूचना देण्यात दयावे.अशा अश्याचे निवेदन भाजप युवा मोर्चा तर्फे दर्यापूर ठाणेदार सुनील वानखडे यांना देण्यात आले यावेळी भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष मृणाल इंगळे यांच्या नेतृत्वात युवा मोर्चा उप जिल्हाध्यक्ष आशिष चौधरी, गटनेते तथा नगरसेवक दिनेश पारडे,नगरसेवक रोशन भाऊ कट्यारमल, भरत शुक्ला, नंदकिशोर कपिले, अंकुश पाटणे, निलेश विल्हेकर, भूषण विल्हेकर, विकास काट्यारमल,राहुल वानखडे,अक्षय विल्हेकर जयेश सोनाळेकर,अथर्व सोनाळेकर हे उपस्थित होते.

## तपासात तीन मोबाइलचा फॉरेन्सिक डेटा एसआयटीच्या हाती

### ◆ परतवाडा व्हिडीओ कांड

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अमरावती :** संपूर्ण राज्याला हादरवून सोडणाऱ्या परतवाडा येथील 'व्हिडीओ कांड' प्रकरणात अमरावती ग्रामीण पोलिसांच्या विशेष तपास पथकाला मोठे यश मिळाले आहे. फॉरेन्सिक लॅबकडे पाठविण्यात आलेल्या पाच मोबाईलपैकी तीन मोबाईलचा डेटा पोलिसांना प्राप्त झाला असून, आता या डेटाच्या सखोल विश्लेषणातून अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता आहे.

या प्रकरणात आरोपींकडून जप्त तीन मोबाईलचा फॉरेन्सिक डाटा तपासण्यात येत आहे व त्याअनुषंगाने पुढील तपास करण्यात येत असल्याची माहिती ग्रामिण पोलिसांकडून शनिवारी देण्यात आली.

आरोपींनी पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मोबाईलमधील अनेक आक्षेपार्ह व्हिडीओ आणि फोटोग्राफ्स डिलीट केल्याचे समोर आले. मात्र, फॉरेन्सिक तपासणीत तीन मोबाईलमधील डेटा रिकव्हर करण्यात पोलिसांना यश आले आहे.

यात आरोपी आणि पीडितांमधील संवाद, कॉल रेकॉर्ड्स्, गॅलरीतील फोटो आणि व्हिडीओंचा समावेश असल्याची शक्यता आहे. आतापर्यंत १८ व्हिडीओ आणि ३९ फोटोग्राफ्स समोर आले आहेत. लॅपटॉप, हार्ड डिस्क आणि टॅब देखील फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठविले जाणार असून, त्यातून अधिक माहिती मिळण्याची शक्यता आहे. यासंदर्भात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची बंद द्वारे भेट घेऊन या घटनेवर सखोल चर्चा केली. व जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्याकडून या घटनेत संदर्भातली सखोल माहिती जाणून घेतली.

**गुन्ह्याची देशभर चर्चा**

अचलपूरचे एसडीपीओ व सहायक पोलिस अधीक्षक तथा एसआयटी प्रमुख शुभम कुमार यांनी दिलेल्या माहितीनुसार, या गुन्ह्याची चर्चा देशभर झाल्यानंतर अयान अहमदच्या सोशल मीडिया फॉलोअर्समध्ये तब्बल ४ हजारांनी वाढ झाली आहे. प्रकरण उघड होण्यापूर्वी अयानचे १८ हजारांच्या घरात फॉलोअर्स होते. ते आता वाढून २२ हजारांवर पोहोचले आहे. अयान हा सोशल मीडिया ब्लॉगर होता. त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरून आक्षेपार्ह असे व्हायरल झाले नाही. त्यामुळे त्याच्या अकाऊंटमधून काही लिंक डिलीट केल्या असल्या तरी त्याचे अकाऊंट सुरू असल्याची माहिती आयपीएस शुभम कुमार यांनी दिली.

**आर्थिक व्यवहारांची चौकशी**

एसआयटी आता यातील 'फायनान्शियल अँगल' तपासत आहे. आरोपींनी या व्हिडीओंच्या माध्यमातून कोणाला ब्लॅकमेल करून पैसे उकळले का किंवा याचा व्यावसायिक वापर केला का, या दिशेने तपास सरू आहे.

**बहुतांश मुली सोशल मीडियातून 'ट्रॅप'**

आरोपी अयान अहमद याने ८ पैकी ६ ते ७ पीडितांशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क साधून त्यांना जाळ्यात ओढल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अयान अहमद याला १३ एप्रिल रोजी अटक केल्यानंतर या प्रकरणाचा गौप्यस्फोट झाला. विशेष म्हणजे, अयान अहमद आणि त्याचा मित्र उजेर खान यांच्यात पैशांच्या देवाण-घेवाणीवरून वाद झाला होता. याच वादातून उजेर खानने अयानच्या मोबाईलमधील व्हिडीओ व्हायरल केल्याची कबुली पोलिसांकडे दिली आहे.

**१० संशयितांची कसून चौकशी**

१७ एप्रिल रोजी एसआयटीने १० संशयितांना चौकशीसाठी बोलावले होते. मात्र, हे १० जण केवळ व्हिडीओ शेअर किंवा फॉरवर्ड करण्याच्या लिंकमधील असल्याने त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. दरम्यान, अयान अहमदच्या कुटुंबावर सामाजिक बहिष्कार टाकल्याची चर्चा परिसरात असली तरी पोलिस प्रशासनाने अधिकृतपणे त्याला दुजोरा दिलेला नाही.

## दर्यापुरात एक्का बादशाह जुगारावर पोलिसांची रेड

### ◆ चार जणांविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १९ एप्रिल

**दर्यापूर :** दर्यापूर अमरावती मार्गावर असलेल्या एका बार च्या मागे मोकळ्या जागेत एक्का बादशा नावाचा जुगार खेळत असल्याच्या माहितीवरून दर्यापूर पोलिसांनी धाड टाकून चार जणांना रंगेहात पकडले.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे शनिवारी दुपारी दर्यापूर अमरावती मार्गावरील बैठक बार च्या मागे एका मोकळ्या जागेत काही जण जुगार खेळत असल्याची माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून स्वानंद ठाकरे ३२ रा. दर्यापूर,अनुप देशमुख २९ रा. अमरावती, मंगेश रायबोले ३८ रा. इटकी, विवेक खंडारे २८ रा. सैनिक कॉलनी दर्यापूर यांना रंगेहात पकडून त्यांच्या जवळून सतरा हजार तीनशे रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक विशाल दांदळे, पो हे कॉ उमेश वाकपांजर, पो कॉ निवृत्ती बरगट, विश्वजीत बैस, लखन होलगरे, यांनी मिळालेले माहिती वरून जुगार खेळत असलेल्या जागेवर जाऊन चार जणांना रंगेहात धरले व त्यांच्यावर दर्यापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी



प्रतिनिधी १९ एप्रिल

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

संचालन व महात्मा बसवेश्वर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## पालकमंत्री बावनकुळे यांची गंगासावित्री निवासस्थानी सदिच्छा भेट

**अमरावती :** अमरावती दौऱ्यावर असताना महाराष्ट्र राज्याचे राजस्व मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी आमदार रवी राणा यांच्या 'गंगासावित्री' निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.विविध स्थानिक व विकासात्मक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. यानंतर पालकमंत्री बावनकुळे यांनी युवा स्वाभिमान पक्ष व भाजप नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांच्या नव्या संपर्क कार्यालयाला भेट देत शहर व जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांसोबत सुमारे एक तास बैठक घेतली. या बैठकीत



अमरावतीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, प्रलंबित प्रकल्पांना गती देणे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला. विशेष म्हणजे, युवा स्वाभिमान पक्ष आणि भाजप नेत्या नवनीत राणा यांच्या संयुक्त संपर्क कार्यालयाचे लवकरच थाटात उद्घाटन होणार असून, त्याच्या पार्श्वभूमीवरच पालकमंत्र्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांसोबत ही बैठक घेतल्याची माहिती आहे.

## बासोर समाजाची सभा

**अमरावती :** बासोर समाज सेवा समिती, अमरावती, क्र. ३७७२/९६ अंतर्गत बासोर समाजाची सभा पार पडली.



सभेत दोन विषयांवर चर्चा झाली: यामध्ये जुन्या पांचोमधून शिल्लक राहिलेल्या ३०० चौरस फूट जागेवर बासोर समाज इमारतीचे बांधकाम करणे बासोर समाज समिती, अमरावतीची जुनी कार्यकारी समिती बरखास्त करून नवीन कार्यकारी समितीची घोषणा करणे. या दोन विषयांवरील सभा यशस्वीरित्या पार पडली. समाजाच्या उर्वरित पांचो जमिनीवर समाज इमारत बांधण्यासाठी अमरावती महानगरपालिकेकडून आलेल्या पत्रावर चर्चा झाली, ज्यानुसार समाजाची जमीन खरेदी करून महानगरपालिकेला द्यायची आहे. यावर जो काही खर्च येईल, तो संपूर्ण समाज मिळून उचलेल. संस्थेचे जिल्हाध्यक्ष प्रेमचंद बामनेल यांनी बासोर समाज इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. महानगरपालिकेशी संपर्क साधून हे काम पूर्ण केले जाईल. या उद्देशाने, सामाजिक बासोर समाज संस्थेच्या नवीन कार्यकारी समितीची घोषणा एकमताने करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि १९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## कवठळ येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान



**मंगरुळपीरः**-मंगरुळपीर तालुक्यातील कवठळ येथील श्री.दामोदर महाराज संस्थानवर दि. १७ एप्रील रोजी महसुल विभागाकडुन आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान कार्यक्रम ऊत्साहात संपन्न झाला. यावेळी विविध शासकीय सेवेचे मान्यवर अधिकाऱ्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात लोकाभिमुख, गतिमान आणि पारदर्शी प्रशासन होते, या त्रिसूत्रीची प्रेरणा घेऊन अभियानाला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिर असे नाव दिले आहे. या अभियानामुळे येत्या काळात सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात बदल घडविण्यास मदत होणार आहे. आगामी काळातही अशा प्रकारच्या शिबिराचे आयोजन करावे अशी मागणी होत आहे.





# गरीब - श्रीमंताचे अंतर, मंजुरांचे पोटासाठी स्तलांतर !

## गावेच्या गावे पडली ओस

● रमेश मुंजे @ मंगरूळपीर ●

तालुक्यातील पोलीस स्टेशन आसेगाव अंतर्गत येत असलेल्या डोंगराळ भागातील सोयाबीन सोंगणीचा हंगाम झाल्यानंतर मजुराच्या हाताला काम नसल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी मजुराचे थवेच्या थवे ऊस तोडणी व कापूस वेचणी वर गेल्यामुळे गावे उजाड पडली आहे.

आसेगाव भागातील गावामध्ये रोजगार हमी योजनेचे कोणत्याच प्रकारे काम सुरू नसल्यामुळे व सोयाबीन सोंगणीचा हंगाम झाल्यानंतर मजुराच्या हाताला कोणत्याच प्रकारे काम नसल्यामुळे टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी काम नसल्यामुळे या भागातील पिंपळगाव, वसंतवाडी रुई, गोस्ता सनगावं, वटफळ शेंगी, भडकुंभा, खापरदरी इत्यादी गावातील मजुराचे स्थलांतर मराठवाड्यात पश्चिम महाराष्ट्रात उसाच्या कारखान्यावर तसेच वर्धा जिल्ह्यामध्ये कापूस वेचणीवर गेल्यामुळे गावे चा गावे उजाड पडली आहे. उसाच्या कारखान्यावर काम करण्यासाठी गेल्यामुळे त्यांच्या काहीसा प्रश्न मिटला आहे मजूर ऊस तोडणी वर गेल्यामुळे त्यांच्या लहान मुलाला सांभाळण्या साठी घरी कोणीच नसल्यामुळे शाळेतील मुलांना सुद्धा सोबत घेऊन गेले आहेत तसेच काही मजुरांनी वयोवृद्ध आई-वडिलांना गावामध्ये शेजारच्या भरोशावर ठेवून काम करण्यासाठी जावे लागले या भागातील मोठ्या प्रमाणात मजुराचे स्थलांतर झाल्यामुळे गावाच्या गावे उजाड पडली आहे. डोंगराळ भागातील मजुराच्या स्थलांतरामुळे जिल्हा परिषद शाळेतील मुलाचे भविष्य अंधारी पडले आहे मजुराच्या हाताला गावामध्ये जर रोजगार हमीचे काम मिळाले असते तर गावे उजाड झाली नसती व मुलाचे भविष्य सुद्धा घडले असते परंतु गावामध्ये मजुराच्या हाताला काम नसून शेती सिंचनाची व्यवस्था नसल्याने मजुराला दुसरा पर्याय नाही तसेच जि प शाळेतील काही मुले मुली आई-वडिलांनी शेजाऱ्याच्या भरोशावर ठेवले असले तरी त्यांना गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनी व शासनाने मदतीचा हात द्यावा तेव्हा त्या मुलांना आई वडील सोडून गेल्याचे दुःख वाटणार नाही असे सहकार्य करावे, तरी शासनाने मजुराचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेचे काम उपलब्ध करून देण्याचे मागणी या भागातील नागरिक सुभाष कावरे डॉ. भगवान भेंडेकर गोपाल संगेकर गजानन खोटे ,अनिकेत फड ओमप्रसाद फड ,भास्कर चौधरी ,विष्णू फड भास्कर दिनकर भांडेकर इसरार महमद खान ,शेख रहीम शेख मुसा, गोविंदा चौधरी प्रकाश भिसे सह सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.



## थोडक्यात

### य.च.महाविद्यालयात पदवी वितरण व विद्यार्थी गुणगौरव सोहळा




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक यशवंतराव चव्हाण शिक्षण महाविद्यालय मंगरूळपीर येथे वर्ष २०२४- २५ चा बी.एड पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या सोहळयात एकूण एकशे चार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले तसेच ण्ऊॅं व ऊॅं परीक्षेत यश संपादन करणा-या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात पार पडला. या परीक्षेत एकूण पंधरा विद्यार्थ्यांनी यश मिळवत महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीत मानाचा तुरा रोवला आहे.

पदवीदान कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री. मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळाच्या संचालिका प्रियाताई चंद्रकांत ठाकरे हया उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरूवात ही दिपप्रज्वलन तथा विद्यापीठगीताने करण्यात आली. यावेळी बोलतांना प्रियाताई ठाकरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, या यशामुळे महाविद्यालयाच्या प्रगतीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांना सामाजिक जबाबदारी व सतत शिकण्याची वृत्ती यावर भर दिला. इतर विद्यार्थ्यांनीही यांच्याकडून प्रेरणा घेउन स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करावे असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. ओमप्रकाश झिमटे, यशवंतराव चव्हाण अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्य प्रा. सुनिता गुलवाडे, प्रा. नंदकिशोर गवई, डॉ. विठ्ठल होनाळे, प्रा. शितल निलटकर, भागवत टोपले,रामेश्वर ढवळे,अभिषेक सुरटकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. विठ्ठल होनाळे यांनी केले तर प्रास्ताविक प्रा. नंदकिशोर गवई यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. शितल निलटकर यांनी केले. कार्यक्रमाला बहूसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.


## घरकुलाला घरघर, पैशासाठी मरमर...

# अर्धे तुम्ही अर्धे आम्हीचा खेळ, लाखोंचा मेळ !

### एकाच नावावर घरकुल दोन , यामध्ये सहभागी कोण * म्हणे 'पैसे देतो सीईयोच्या हाती, मग कशाची भीती

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●









मालेगाव पंचायत समिती घरकुल विभागात मोठा भ्रष्टाचार – मोदी आवास, प्रधानमंत्री आवास आणि रामाई योजनेत दुहेरी लाभांचा घोटाळा उघड गरीबांसाठी केंद्र व राज्य सरकारकडून प्रधानमंत्री आवास योजना (प्रधानमंत्री घरकुल योजना / मोदी घरकुल योजना) तसेच रामाई घरकुल योजना राबवली जाते. मात्र प्रशासन आणि पंचायत समिती मालेगाव यांच्या संगनमतामुळे या योजनांतून मोठा घोटाळा उघडकीस आला आहे.एका कुटुंबाला फक्त एकच घर मिळण्याचा नियम असताना प्रत्यक्षात काहींना सलग दोन योजनांतून लाभ मिळाला तर काहींना पती-पत्नी दोघांना स्वतंत्र घर मंजूर झाले.घर गरीबांचे, पण हिशोब दलालांचा! शासनाच्या घरकुल योजनांमधून शेकडो घरकुलांचा घोळ उघडकीस आला असून, दलालांच्या माध्यमातून झालेला 'मेळ' आता कोट्यवधींच्या खेळात बदलला आहे.

मालेगाव पंचायत समितीच्या संगनमताने अनेक अपात्र लाभार्थ्यांना दुहेरी घरकुल मंजूर करण्यात आली. काहींना मोदी घरकुल आणि प्रधानमंत्री घरकुल अशा दोन वेगवेगळ्या योजनांतून घरे मिळाली, तर काही प्रकरणांत पती-पत्नी दोघांनाही स्वतंत्र घर मंजूर झाले.या सर्व प्रकरणांचे पुरावे सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागले असून, शासनाच्या निधीचा गैरवापर कसा आणि कोणाच्या संगनमताने झाला याचे धक्कादायक चित्र आता उघड झाले आहे.या योजनांत दलालांचे वर्चस्व स्पष्ट दिसत आहे. अर्जदारांकडून टक्केवारी घेऊन अर्ज मंजूर करून घेण्याची पद्धत सुरू आहे. अनेक ठिकाणी खोटी कागदपत्रे, बनावट लाभार्थी आणि चुकीची माहिती देऊन सरकारी मंजुरी मिळवण्यात आली आहे. ग्रामपंचायतीपासून पंचायत समितीपर्यंत दलाल आणि अधिकारी यांचा संगनमताचा कारभार उघडकीस येत आहे.

**शासनाची दिशाभूल, कोट्यवधींचा भ्रष्टाचार**

मालेगाव पंचायत समितीने आणि संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाला चुकीची माहिती देऊन लाखो रुपयांचा निधी चुकीच्या खात्यांवर वितरित केला आहे.या प्रकरणात 'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही' असा भ्रष्ट व्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. 'पात्र गरीब आजही घरासाठी अर्ज घेऊन फिरतात, पण दलालांकडे पैसा दिला की मंजुरी लगेच मिळते.या प्रकरणाची जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तातडीने चौकशी करून दोषींवर गुन्हा दाखल करावा आणि कोट्यवधींची वसुली करावी,' अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.'घर गरीबाचं... पण हिशोब दलालांचा! अशा भ्रष्ट व्यवस्थेत न्याय कुठे मिळणार?'एका कुटुंबाला फक्त एकच घरकुल मिळू शकते.पती-पत्नीला स्वतंत्र घर मंजूर करणे किंवा सलग दोन योजनांतून लाभ देणे हा थेट नियमभंग व भ्रष्टाचाराचा पुरावा आहे.'गरीब पात्र कुटुंबांना आजही घर नाही, पण काहींना दोन-दोन घरे मिळतात. पंचायत समिती मालेगावच्या संगनमतामुळे हा उघड भ्रष्टाचार घडतोय. पैसे खाल्ले कोण? याचा शोध घेऊन जबाबदारांवर गुन्हा दाखल व्हावा,' अशी ग्रामस्थांची मागणी आहे.भ्रष्ट अधिकाऱ्यांवर आणि संगनमत करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा.खरी पात्र कुटुंबे शोधून त्यांना घरकुल द्यावे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांचा प्रश्न कायम आहे .असली पात्रांना घर मिळणार कधी? आणि दुहेरी घर घेणाऱ्यांवर कारवाई होणार कधी?'

**सबळ पुरावे 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या हाती.**

या सर्व प्रकरणांचे सबळ पुरावे सिटी न्यूज सुपरफास्टच्या हाती लागलेले आहेत.यातून हे स्पष्ट झाले आहे की मालेगाव पंचायत समितीने लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करत शासनाची दिशाभूल केली आहे.'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही' असा व्यवहार यात स्पष्टपणे दिसून येत असून,यातून शासन निधीचा सरळ गैरवापर झाल्याचे उघड झाले आहे. 'या भ्रष्ट अधिकारी कर्मचारी विरुद्ध गुन्हा दाखल करून सर्व लाभ रद्द करण्यात यावेत.जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावीआणि शासनाकडून फसवणूक करून घेतलेले पैसे वसूल करावेत,'अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**हा घ्या पुरावा, नाव एकच घरकुल दोन शेकडो पुरावे 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या हाती.**

१) मदन रामदास पाढघन एम. एच. – ३२ – ००२ – ०८९ – ००१ / आर. ए. वाय. एस. ७६८९८१८० – रामाई घरकुल योजना २०२३–२४ एम. एच. १३४२४६४३५ – प्रधानमंत्री घरकुल योजना २०२४–२५एकाच नावावर दोन घरकुल. २) कसाबाई भिकाजी इंगोले एम. एच. – ३२ – ००२ – ०८९ – ००१ / एम. ए. जी. वाय. ३४९७६८८८ – मोदी घरकुल योजना २०२३–२४ एम. एच. १२५१८७६३० – प्रधानमंत्री घरकुल योजना २०२५–२६ सलग दोन योजनांतून लाभ. ३) उमेश देवराव इंगोले एम. एच. – ३२ – ००२ – ०८९ – ००१ / एम. ए. जी. वाय. २३७६३६ – मोदी घरकुल योजना २०२३–२४ एम. एच. १२५००६७८८ – प्रधानमंत्री घरकुल योजना २०२५–२६ सलग दोन योजनांतून लाभ. ४) रमेश्वर दत्तारावइंगोले – छाया रमेश्वर इंगोले एम. एच. – ३२ – ००२ – ०८५ – ००१ / २४५४५५४५ – रमेश्वर इंगोले यांना मोदी घरकुल योजना एम. एच. १२९८१९७३१ – पत्नी छाया रमेश्वर इंगोले यांना प्रधानमंत्री घरकुल योजना पतीला मोदी घरकुल, तर पत्नीला प्रधानमंत्री घरकुल.

# समाधान शिबिराकडे दुर्लक्ष, जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावे लक्ष !

### *शिबिरातून नायब तहसीलदार झाले गायब, लक्ष द्या हो साहेब * पुन्हा शिबिर घेण्याची मागणी

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

दि. १७ एप्रिल २०२६ 'महास्वराज्य समाधान शिबिर' नागरिकांच्या समस्या जागेवर सोडवण्यासाठी आयोजित करण्यात आले होते; मात्र प्रत्यक्षात शिबिरातच मोठा गोंधळ उडाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नियुक्त नायब तहसीलदार कुळमेथे यांनी शिबिर अर्धवट सोडून तिथून पळ काढल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत असून, यामुळे शिबिराचा उद्देश पूर्णपणे फोल ठरल्याचे दिसून आले.

शिबिरात मोठ्या संख्येने शेतकरी व नागरिक आपले प्रश्न घेऊन आले होते जमीन नोंदी, ७/१२ उतारे, पीकनुकसान, प्रमाणपत्रे अशा विविध कामांसाठी लोक रांगेत उभे होते. मात्र जबाबदार अधिकारीच अचानक निघून गेल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले. अनेकांचे अर्ज न स्वीकारता, न सोडवता शिबिर संपुष्टात आल्याने संतापाची लाट उसळली आहे.स्थानिकांनी संतप्त प्रतिक्रिया देत विचारले, 'हे कसले समाधान शिबिर? अधिकारीच पळून जात असतील तर जनतेने न्याय कुठे मागायचा?' शासनाच्या नावाखाली होणारा हा प्रकार म्हणजे सरळ जनतेची दिशाभूल आणि प्रशासनाची बेफिकीरी असल्याचा आरोप होत आहे.या घटनेमुळे संबंधित तहसीलदार यांच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शिबिर सुरळीत पार पडणे ही त्यांची जबाबदारी असताना, शिबिर वाऱ्यावर सोडले जाणे ही गंभीर बाब मानली जात आहे.दरम्यान, अधिक गंभीर बाब म्हणजे शिबिर सोडून संबंधित अधिकारी मेहकर–मालेगाव महामार्गावर जाऊन वाळूच्या टिप्परांवर कारवाई करत असल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, नागरिकांच्या समस्या सोडवण्यापेक्षा वाळू कारवाईला प्राधान्य दिले का? असा सवाल उपस्थित होत आहे. काही नागरिकांनी तर उघडपणे शंका व्यक्त केली की, 'समाधान शिबिरातून काय मिळणार आणि वाळूच्या गाड्यांमधून काय मिळते?'याच अधिकाऱ्यांवर काही महिन्यांपूर्वी किनवट परिसरातील एका शेतकऱ्याला 'आत्महत्या करा' असा सल्ला दिल्याचा आरोपही चर्चेत होता. त्या प्रकरणात ठोस कारवाई झाली का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे सध्याच्या घटनेमुळे त्यांच्या वर्तनावर आणखी गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### आधी आत्महत्येचा सल्ला, आता शिबिरातून पळ, एकामागून एक प्रकार; कारवाईचा प्रश्न ऐरणीवर

परिसरात संबंधित नायब तहसीलदार कुळमेथे यांच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. काही महिन्यांपूर्वी रस्त्याच्या मागणीसाठी गेलेल्या एका शेतकऱ्याला 'रस्ता मिळणार नाही, आत्महत्या करा' असा सल्ला दिल्याचा आरोप झाला होता. या घटनेची जिल्हाभर चर्चा झाली, शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली; मात्र त्या प्रकरणात नेमकी काय कारवाई झाली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आता त्यातच भर म्हणून, शासनाच्या 'समाधान शिबिर' उपक्रमात जिथे नागरिकांच्या समस्या जागेवर सोडवण्याचे उद्दिष्ट आहे.त्याच अधिकाऱ्यांनी शिबिर अर्धवट सोडल्याचा आरोप समोर आला आहे. 'मला काम आहे' असे सांगत शिबिर वाऱ्यावर सोडून ते निघून गेले, अशी माहिती समोर येत आहे.यानंतर ते मेहकर-मालेगाव महामार्गावर वाळूच्या डंपरांवर कारवाई करत तासन्तास थांबले होते, अशी चर्चा आहे.







## महामानवाचे विचार प्रमाण मानून कवी, लेखकांनी लेखन करावे- डॉ.अशोक इंगळे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतदर्शी विचार प्रमाण मानून कवी, लेखकांनी लेखन केले, तरच क्रांतदर्शित्व समाज निर्माण होऊ शकतो, असे प्रतिपादन आंबेडकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून समीक्षक, विचारवंत,ज्येष्ठ कवी, डॉ.अशोक इंगळे यांनी प्रतिपादन केले. सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचा बदल घडवून येण्यासाठी आजच्या विपरीत परिस्थितीत कवी, लेखकांनी आपली लेखणी परजली पाहिजे.आंबेडकरनिष्ठ असा शब्दप्रयोग मी जाणीवपूर्वक करतो. निष्ठेशिवाय मानवी जगण्याला अर्थ नसतो. असे अध्यक्षीय भाष्य इंगळे यांनी केले.साहित्य संमेलनाचे उद्घाटन यावेळी ज्येष्ठ कवी, लोकनाथ यशवंत लोकनाथ यांनी केले.

यावेळी स्वागताध्यक्ष, ज्येष्ठ समाजसेवक,अनंतकुमार केशवराव जुमडे होते. प्रमुख उपस्थिती प्रसिद्ध उद्योजक,पद्मकुमार धोंडोपंत राऊत, अर्बन बँकेचे संचालक, तेजराव वानखेडे,समाजपुढारी,दौलतराव हिवराळे, वाशीम पोलीस स्टेशनच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील, पनवेल येथून आलेले ज्येष्ठ साहित्यिक, नागनाथ डोलारे आदींची उपस्थिती होती. यावेळी 'वत्सगुल्मी' या मीनाक्षी नगराळे यांनी संपादित केलेल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतगीत, शाहीर ,धम्मानंद इंगोले इंगोले, भास्कर गायकवाड, यांनी सादर करुन संमेलनात रंगत आणली. प्रास्ताविक, ग.ना. कांबळे यांनी केले. संमेलनाची भूमिका कवी, अनिल कांबळे यांनी मांडली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन अत्याचार; गुन्हा दाखल

### पीडिता गर्भवती : जलंब ठाण्यांतर्गत घटना

खामगाव : जलंब अल्पवयीन मुलीला पळवून नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध जलंब पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ वर्षे ११ महिने वयाच्या पीडितेला आरोपीने फूस लावून पळवून नेले. त्यानंतर तिच्यावर वारंवार शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याचा आरोप आहे.ही घटना मे २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १३७ (२), ६४ (२) तसेच पोक्सो कायदा अंतर्गत कलम ८ व १२ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# बळीराजाच्या न्यायासाठी युवक काँग्रेसचा एल्गार !

## खामगाव येथे 'शेतकरी न्याय सत्याग्रह' आंदोलन - शेतकरी विरोधी धोरणांचा केला निषेध

प्रतिनिधी १९ एप्रिल

*खामगाव : केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांविरुद्ध आणि बळीराजाच्या न्यायासाठी बुलडाणा जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने 'शेतकरी न्याय सत्याग्रह' पुकारण्यात आला आहे. दरम्यान शेतकरी विरोधी ळए ट्रेड डील रद्द कर, शएइ ची कायदेशीर हमी द्या यासह अन्य मागण्यांसाठी आज दि. १८ एप्रिल रोजी खामगाव येथे सत्याग्रह आंदोलन करण्यात आले.*

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज मोरे यांच्या आदेशानुसार युवक काँग्रेसच्या वतीने भारत - अमेरिका कराराविरोधात खामगाव येथील एसडीओ कार्यालयासमोर सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करून केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांचा निषेध नोंदविण्यात आला. त्यानंतर दुपारी उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान व केंद्रीय कृषी मंत्र्यांना निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात केंद्र सरकार मार्फत प्रस्तावित भारत - अमेरिका व्यापार करार करण्यात येणार आहे. या करारामुळे देशातील कृषी क्षेत्रातील शेतकरी उत्पन्न, पीक पध्दती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची दाट शक्यता आहे तसेच अनेक गंभीर परिणाम उद्?भवू शकतात. त्यामुळे प्रस्तावित कराराचा जिल्ह्यातील कृषी क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा सविस्तर रिपोर्ट तयार करण्यात यावा, शेतकऱ्यांसाठी संरक्षणात्मक उपाययोजना सुचवून शासनाकडे प्रस्ताव पाठवावा, पीक नियोजन, बाजार व्यवस्थापन व जोखीम व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शक सुचना जारी करण्यात याव्यात, एमएसपी व एपीएमसी व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी शिफारशी करण्यात याव्यात, दुग्ध व पुरक व्यवसायांच्या संरक्षणासाठी विशेष योजना राबविण्यात याव्यात आणि शेतकरी हितासाठी भारत - अमेरिका कृषी क्षेत्रा संदर्भातील करार रद्द करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

या सत्याग्रह आंदोलनामध्ये खामगाव काँग्रेस तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, खामगाव विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अचलेश्वर दिपके, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, धनंजय देशमुख, जिल्हा संघटन सचिव अतुल सिरसाट, शेगाव काँग्रेस तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर शेजोळे, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, राजाराम काळणे, कैलास फाटे, असलम पटेल, सीमाताई संजय ठाकरे पाटील, भारती संजय पाटील, डॉ.तब्बसुम हुसैन, राजकुमारी चौहाण, स्मिता भोसले, शिवदास घ्यार, सागर पांढरे, निलेश देशमुख, बबलु पठाण, पंकज गमे, मनोज बोदडे, अमित तायडे, साहिल देशमुख, संजय तायडे, संतोष चांदुरकर, विनोद शेजव, जयसिंह बघेल, घनशाम सावरकर, दिलीप राजपूत, सय्यद जाफर, अक्षय शंकरवार, प्रमोद मोरे, शेख इमरान, अजीज मोहम्मद, सतीष इंगळे, श्रीकृष्ण मोरे, रमेश मुऱ्हे, प्रमोद फाटे, विठ्ठल सोनटक्के, गजानन मुळीक, अनंता खंडारे, अनंता तोडेकर, आकाश चतारकर, संभाजीराव टाले, शुभम काळुसे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते व पदाधिकारी, युवक काँग्रेसचे सर्व पदाधिकारी तसेच काँग्रेसच्या विविध सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# वैदर्भिय पंढरी शेगावला दारुबंदी करावी

## दारुमुक्ती आंदोलनचे संजय बोदडे यांचा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी १९ एप्रिल

**खामगाव :** वैदर्भिय पंढरी, गजानन महाराजांची संतनगरी म्हणून नावलौकिकास आलेले तिर्थक्षेत्र शेगाव हे त्वरीत दारू मुक्त करण्यात यावे, अशी मागणी दारू मुक्ती आंदोलनाचे जिल्हा संघटक संजय बोदडे यांनी जाहिर मागणी केली आहे.

यापूर्वी दारुमुक्ती आंदोलनाचे वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांना १५ जुलै २०२५ रोजी मुंबईत विधानसभा अधिवेशन दरम्यान दारुमुक्ती आंदोलनाचे संयोजक भाई रजनीकांत व उदयनगरचे माजी सरपंच, भूमि मुक्ती मोर्चाचे भाई प्रदिप अंभोरे यांनी धरणे आंदोलन करुन निवेदन दिले होते, महाराष्ट्र सरकारने लगेच निर्णय न घेतल्याने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संजय बोदडे यांनी जाहीरपणे दिला आहे. महाराष्ट्र सरकारने, अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी या तीर्थक्षेत्राला यापूर्वीच दारू मुक्त केलेले आहे, त्याचप्रमाणे वैदर्भीय पंढरी असलेले प्रथमश्रेणीचे तिर्थ क्षेत्र शेगाव हे दारु मुक्त करावे. या प्रकारची मागणी ५ मे २०१५ रोजी शेगावनगर पालिकेच्या तत्कालीन नगराध्यक्षा सौ. शारदा कलोरे, व उपाध्यक्षा सौ. ज्योती मुंधडा यांनी नगर परिषदे मध्ये ठराव पास केला होता. व सरकारकडे पाठविला होता, त्याप्रमाणे तातडीने सरकारने कार्यवाही करणे आवश्यक होते, ती अद्याप केली नाही. या ठरावाप्रमाणे ताबडतोब स्थानिक आमदार डॉ. संजय कुटे व बुलढाणा जिल्ह्यातील सर्व आमदार केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव व बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी ताबडतोब या मागणीकडे लक्ष घालून शेगाव तीर्थक्षेत्र हे दारू मुक्त करावे. शेगावचे गजानन महाराज मंदिराच्या २०० मीटर अंतरापासून, गांधी चौक, शिवाजी महाराज पुतळा, पुढे रेल्वेस्टेशनपर्यंत मंदिराचे मुख्य रस्त्यावर दारूची दुकाने थाटली. आहेत व दारुडे दारु पिऊन अनेकदा लोळण घेऊन असतात, व शिवीगाळ तसेच भांडणे करतात, त्यामुळे दर्शनार्थी महिला, मुले भयभित होतात, तसेच त्यांच्या भावनांना धक्का पोहोचतो, व सर्व वातावरण अमंगल होते. तिर्थक्षेत्र शेगांव संतनगरीचे पावित्र्य जपण्याकरीता महाराष्ट्र सरकारने तांतडीने विधानसभेच्या येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेगांव तिर्थक्षेत्र दारु बंदीची घोषणा करावी, या मतदार संघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांनी वैदर्भिय जनतेच्या या मागणीबद्दल सरकारकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी संजय बोदडे यांनी केली आहे.

# प्लास्टिक पिशव्या उकिरड्यावर, जनावरांचे आरोग्य धोक्यात

प्रतिनिधी १९ एप्रिल



**खामगाव :** शहरात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असतानाही प्रत्यक्षात तिची अंमलबजावणी फक्त कागदोपत्रीच 'होत आहे. शहरातील विविध भागांत रस्त्यालगत प्लास्टिक पिशव्यांचे ढीग साचलेले दिसून येत असून, या पिशव्या कचऱ्या सोबतच मोकाट गुरांच्या खाण्यात जात असल्याचे धक्कादायक वास्तव पाहणीतून उघड झाले आहे.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने २३ मार्च २०१८ पासून राज्यभरात प्लास्टिक व थर्माकोलपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तूंवर बंदी घातली आहे.

या निर्णयानुसार ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. तर ५० मायक्रॉन किंवा त्याहून अधिक जाडीच्या पिशव्यांना काही अटींसह परवानगी देण्यात आली आहे; मात्र प्रत्यक्ष परिस्थिती याउलट असल्याचे दिसून येते.शहरातील मुख्य रस्त्यालगत आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या सर्रास वापरात असल्याचे आढळून आले. कचऱ्यासह या पिशव्यांचे ढीग तयार झाले असून, स्वच्छतेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. याकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

### ठोस उपाययोजना गरजेची

शहरातील विविध भागात कचऱ्याच्या ढिगात प्लास्टिक पिशव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या भागात मोकाट गुरांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असून, काही गुरे या प्लास्टिक पिशव्या खात असल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे गुरांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्लास्टिक झाली आहे. बंदीची प्रभावी अंमलबजावणी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे

# ज्वारी, मका व कांदा काढण्याची लगबग



### मशागतीची कामे सुरू

**खामगाव :** लग्न सराई च्या दिवसां बरोबर शेतकरी खरिपाच्या तयारीला सुध्दा लागला आहे. उन्हाळी ज्वारी, मका, कांदा काढण्याची लगबग अनेक शेतांमध्ये दिसू लागली आहे. वास्तविक पाहता यंदा खासगी हवामान विभागाने पावसाळा कमी असल्याचा अंदाज व्यक्त केला असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांनी मात्र या अंदाजाकडे दुर्लक्ष करून शेती मशागतीचा जोश कायम ठेवला आहे.

गेल्या मार्च नंतर आता एप्रिलमध्ये कडक उन्हाचा चटका बसू लागला आहे. त्यातच एप्रिल महिन्यातच शेती मशागतीला गती आली आहे. कारण शेतकऱ्यांमध्ये उन्हाळी ज्वारी व मका सोंगण्याची लगबग दिसत आहे. २० मे नंतर पहाटी ची लागवड केल्या जाते. त्यामुळे किमान १ महिना तरी शेती तयार करुन ठेवणे गरजेचे आहे. त्याच अनुषंगाने शेतकरी कामाला लागला आहे शेतकऱ्यांनी शेतीची नांगरटी सुध्दा केली आहे. तर दुसरीकडे खासगी हवामान विभागाने यावेळी पावसाळा कमी होईल. असा अंदाज व्यक्त केला आहे. मात्र या अंदाजाकडे शेतकऱ्यांनी फारसे लक्ष दिले नाही. नेहमीप्रमाणे त्यांनी यावेळी सुध्दा पेरणीचे नियोजन केले आहे. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पेरणी केल्या जात असली तरी मे च्या २० तारखे नंतरच पहाटीची लागवड केल्या जाते. त्यामुळे शेतकरी हवामान खात्याच्या अंदाजाला न जुमानता शेती मशागतीत मग्न दिसत आहे

### गाळ वातावरणामुळे धांदल

हाती आलेला मका, ज्वारी व कांदा घरी आणण्यासाठी शेतकरी रात्रीचा दिवस करु लागले आहे. त्यातच शुक्रवार व शनिवारला ढगाळ वातावरण होते. या वातावरणाचा परिणाम शेतकऱ्यांवर होवून त्यांच्यात एकच धांदल उडालेली दिसून आली. अवकाळी पाऊस झाला तर मका, ज्वारी व कांद्याला त्याचा फटका बसून शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाहीं.

# जळगाव जामोदमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ! बंद घरे फोडून 65 हजारांचा ऐवज लंपास

**जळगाव जामोद :** शहरातील द्वारकानगर व पाटील नगर परिसरात बंद घरांना लक्ष्य करत अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा ६५ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुनील प्रभाकर हागे (३६) हे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक असून, ते काही दिवसांपासून घर बंद करून गावी गेले होते. दरम्यान, १७ एप्रिल रोजी त्यांच्या घराचे कुलूप तुटल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घरी येऊन पाहणी केली असता घरातील लोखंडी कपाट फोडून चोरट्यांनी साहित्य केल्याचे आढळले. अस्ताव्यस्त चोरट्यांनी घरातून सोन्याची चैन, कानातील दागिने, चांदीचा शिक्का व रोख रक्कम असा मुद्देमाल लंपास केला. याशिवाय परिसरातील इतर बंद घरांनाही चोरट्यांनी लक्ष्य केले. पाटील नगर भागातील एका घरातून लहान मुलीच्या सोन्याच्या अंगठ्यांची चोरी झाली. काही घरांची कुलपे तोडण्यात आली असली तरी सर्वत्र चोरी झालेली नाही. अलीकडील काळात जळगाव जामोद तालुक्यातही चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत.

### एकाच वेळी अनेक घरांना केले लक्ष्य

द्वारकानगर व पाटील नगर भागात एकाच वेळी अनेक घरांची कुलपे तोडल्याचे आढळून आले. काही ठिकाणी चोरी यशस्वी झाली, तर काही ठिकाणी प्रयत्न अयशस्वी ठरले. याप्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास नितीनकुमार विनायक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार संजय वेरूळकर करीत आहेत.

# शेतरस्ता मोकळा करण्यासाठी तहसीलसमोर शेतकऱ्याचे आमरण उपोषण

प्रतिनिधी १९ एप्रिल

**सिंदखेडराजा :** प्रशासकीय स्तरावर सर्व पाहणी होऊन आणि बाजू सत्याची असतानाही शेतरस्ता मोकळा करून मिळत नसल्याने संतप्त झालेल्या एका शेतकऱ्याने आता टोकाचे पाऊल उचलण्याचे ठरवले आहे.मौजे वर्दडी खुर्द येथील शेतकरी विजय सुधाम साळवे यांनी आपल्या कुटुंबासह १६ एप्रिल पासून तहसील कार्यालय, सिंदखेडराजा येथे आमरण उपोषणाला बसण्याचा सुरुवात केली आहेत.



विजय साळवे यांची वर्दडी खुर्द (ता. सिंदखेडराजा) येथे गट नं. ७८ मध्ये शेती आहे. त्यांच्या शेतात जाण्यासाठी गट नं. ७७आणि ९२ मधून रस्ता आहे. मात्र, गेल्या काही काळापासून हा रस्ता अडवण्यात आला आहे. रस्ता बंद असल्यामुळे साळवे यांना शेतीची मशागत करता येत नाही, परिणामी त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.

साळवे यांनी दिलेल्या पत्रानुसार, त्यांनी २१ जुलै २०२५ रोजी याप्रकरणी प्रथम तक्रार केली होती. त्यानंतर नायब तहसीलदार आणि संबंधित विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली. या पाहणीत रस्ता बंद असल्याचे सिद्ध झाले असून, सातबारा, ८-अ आणि फेरफार यांसारखी सर्व कागदपत्रे साळवे यांच्या बाजूने आहेत. असे असतानाही, रस्ता अडवणाऱ्या संबंधित व्यक्तींवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप साळवे यांनी केला आहे.

# खामगांव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांचे सुयश

### सभापती व संचालक मंडळाच्यावतीने यशस्वींचा सत्कार

**खामगांव :** शेतकरी बांधवांच्या पाल्यांना स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी मोठ्या शहरात जावून वास्तव्य करावे लागत होते त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर अभ्यासाकरीता आपल्या घरीने काम करता येईल ही बाब लक्षात घेता. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सन २०१६ पासून टीएमसी यार्ड परिसरात मोफत मनोबल अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे. शनिवार दिनांक १८ एप्रील रोजी अभ्यासिकेतील ३ विद्यार्थांची विविध शासकीय पदांवर निवड झाल्यामुळे बाजार समितीचे सभापती श्री श्रीकृष्ण टिकार व समस्त संचालक मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

स्पर्धा परिक्षेची पूर्व तयारी करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने शेतकरी बांधवाच्या पाल्यांसाठी सुसज्ज अशी मनोबल अभ्यासिकेची निर्मिती करण्यात आली आहे. सदर अभ्यासिकेत मोफत वाय-फाय इंटरनेट सुविधा व शासनाच्या सर्वच शासकीय व निमशासकीय परिक्षांचा, अभ्यासासाठी लागणाऱ्या विविध पुस्तकांची सोय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यांत आली आहे. आजरोजी अभ्यासिकेतील ५८ विद्यार्थांची निवड शासकीय तथा निमशासकीय पदांवर झाली आहे. यावेळी स्वामिनी इंगळे रा.निमकवळा अकोला जिल्हा पोलीस, विपुल लवंड रा. खामगांव यांची खामगांव अर्बन बँक लिपीक पदी तर पृथ्वीराज चव्हाण रा. हिंगणा कारेगांव यांची मुंबई लोहमार्ग पोलीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल बाजार समितीचे सभापती श्रीकृष्ण टिकार, उपसभापती संघपाल जाधव व संचालक मंडळाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचे हार पुष्पगुच्छ व पेढा भरवुन सत्कार करण्यात आला.

# विवरा येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ग्रामगीता ज्ञानयज्ञ सप्ताह

प्रतिनिधी १९ एप्रिल



च**मलकापुर :** तालुक्यातील ग्राम विवरा येथे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ११७ व्या जयंतीनिमित्त श्री ग्रामगीता संगीतमय सोहळ्याचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे दि. १३ एप्रिल सोमवार पासून या सप्ताहास प्रारंभ झाला असून या सप्ताहात कथा प्रवक्ते ह.भ.प शिवदास महाराज शृंगारे गुरुकुंज आश्रम, दास टेकडी यांच्या अमृततुल्य वाणीतून सुरू आहे. सप्ताहात सकाळी साडेपाच ते साडेसहा सामूहिक ध्यान, सकाळी साडेसहा ते साडेसात रामधून, ग्रामगीता संगीतमय कथा सकाळी साडेआठ ते साडे अकरा व दुपारी तीन ते पाच, सामुदायिक प्रार्थना संध्याकाळी सहा ते सात, कीर्तन राती आठ ते दहा, सप्ताहाची सांगता दि.२० एप्रिल २६ सोमवार रोजी होऊ घातली आहे. या सप्ताहात १३ एप्रिल रोजी ह.भ.प अरुण महाराज जामठी, मंगळवार १४ एप्रिल ह भ प सोपान महाराज काळे बेटावद, १५ एप्रिल बुधवार ह भ प रितेश महाराज कुंड बु, १६ एप्रिल ह भ प दिव्याताई मापारी महाराज खैरा, १७ एप्रिल शुक्रवार सुनील महाराज लांजुळकर, १८ एप्रिल शनिवार ह भ प गुलाब महाराज चिखली, १९ एप्रिल रविवार ह भ प अक्षराताई महाराज शेगोकार माकोडी, सोमवार दि. २० एप्रिल ह भ प शिवदास महाराज दास टेकडी यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी या कथा श्रवणाचा व दि. २० एप्रिल २६ रोजी महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन गुरुदेव सेवा मंडळ विवरा चे अध्यक्ष प्रमोद डमाळे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर संबारे, सदस्य भास्कर वरूळकर, पुंजाजी चोपडे, प्रकाश नाफडे,रामचंद्र संबारे, अर्जुन चौधरी, किसन चोपडे, कडूबा सोनोने, पंडित सोनोने, नीना नांदोकार, सुखदेव वाडसे, हरिचंद्र संबारे, भागवत संबारे, बाळकृष्ण पाटील, शिवाजी पाटील, नारायण सोनोने ,रामराव बोदडे, दिनकर वरूळकर, गणेश कडू, सुनील संबारे, नारायण चौधरी, प्रशांत कडू, किशोर इंगळे सह बालदेव गुरु सेवा मंडळ विवरा चे आदित्य कडू ,कार्तिक पाटील, शिवम पाटील ,प्रणव व्यवहारे, सह आदिंनी भक्तगणांना केले आहे.

# जमिनीच्या व्यवहारात २६ कोटींची फसवणूक

**जळगाव जामोद :** जमीन खरेदी विक्रीच्या व्यवहारात मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत २५ कोटी ९२ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी १५ एप्रिल रोजी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी डॉ. किशोर किसनलाल केला (६५, रा. जळगाव जामोद) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी कन्हैयालाल देवीचंद छोरिया व अनमोल कन्हैयालाल छोरिया (रा. पुणे) यांनी संगनमत करून राज्यभरात जमीन खरेदी करणे व त्यावर ले-आऊट प्रकल्प उभारण्याचे आश्वासन देत गुंतवणुकीस प्रवृत्त केले.

महसूल विभागातील गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी शासनाने नविन योजना केल्या आहेत, ऑनलाईन व्यवहारामुळे चुकीच्या कामांना पायबंद बसला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## अकोला रेल्वे स्थानकावर थंड पाण्यासाठी वणवण

**अकोला :** ४४ अंश तापमानात अकोला रेल्वे स्थानकावर थंड पाणी उपलब्ध नसल्याने प्रवाशांना पाणी विकत घेण्याशिवाय पर्याय नाही. कुलिंग यंत्रणा बंद आहे. प्लॅटफॉर्म क्रमांक १ ते सहा पर्यंत ही समस्या निर्माण झाल्याची धक्कादायक माहिती आहे. एकीकडे थंड पाणी नाही आणि उपलब्ध गरम पाणी पिणे अशक्य आहे. यामुळे प्रवाशांना थंड पाणी मिळत नाही. त्यामुळे पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत आहे. पूर्वी उन्हाळ्यात प्रवाशांची सोय व्हावी म्हणून थंड पाणी उपलब्ध करून देत होते. परंतु सध्या ते देखील मिळत नाही. पाणी समस्या सोडविण्यासाठी रेल्वे स्थानक प्रशासनाने त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. कारण अकोला रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी देशाच्या विविध भागात जातात आणि २० रूपये खर्च करून विकत घेण्याची प्रत्येकाची ऐपत नसते.

# भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा







प्रतिनिधी १९ एप्रिल

**अकोला :** ब्राह्मण समाजाचे आराध्य दैवत भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त अकोल्यात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाज बांधव पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. 'परशुरामाच्या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

खोलेश्वर मधील भगवान परशुराम चौकात शनिवारी सायंकाळी आरती झाली. त्या नंतर शोभायात्रा सुरू झाली. यावेळी रामप्रकाश मिश्रा, विजय तिवारी, उदय महा, नगर सेवक निलेश देव, प्रशांत जोशी, सागर भारूका, भरत मिश्रा, मनोज शर्मा, संजय शर्मा, अजय शर्मा, ॲड. सत्यनारायण जोशी, कृष्णा शर्मा, अशोक शर्मा, गिरीराज तिवारी, सुधीर देशपांडे यांच्यासह समाज बांधव, भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत असताना विविध ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. आकर्षक देखावे, मंगल वाद्याचा गजर होता. भगवान परशुराम यांची भव्य प्रतिमा शोभा यात्रेच्या अग्रभागी होती. या सोहळ्यामुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. खोलेश्वर स्थित परशुराम चौक, सिटी कोतवाली, कपड़ा बाजार, सराफ बाजार, गांधी चौक, तहसील चौक, चित्रा चौक मार्गे फिरून परशुराम चौकात समारोप झाला. कार्यक्रमात समाजातील पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अकोल्याचे अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड निलंबित



प्रतिनिधी १९ एप्रिल

**अकोला:** अकोल्याचे अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांना कर्तव्यात कसूर करणे आणि भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपाखाली महाराष्ट्र शासनाने तत्काळ प्रभावाने शासकीय सेवेतून निलंबित केले आहे. महसूल व वन विभागाने १६ एप्रिल २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत.

अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्यावर एका खाणधारकाकडून पैशांची मागणी करून त्याला धमकी दिल्याचा गंभीर आरोप आहे. याप्रकरणी १४ एप्रिल २०२६ रोजी अकोल्यातील एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्यावर खालील कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. कार्यालयात विनापरवानगी वारंवार अनुपस्थित राहणे, अर्धन्यायीक प्रकरणांचा वेळेत निकाल न लावणे आणि अधिकारांचा गैरवापर करणे, असे ठपकेही त्यांच्यावर ठेवण्यात आले आहेत.

शासकीय नियमांचे उल्लंघनगायकवाड यांच्या या कृत्यामुळे त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

अकोला जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यावर कारवाई झाल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चर्चेला उत आला होता.



भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे काल अकोला आगमन झाले असता त्यांचे स्वागत मुर्तिजापूरचे आमदार हरिष पिंपळे यांनी केले. यावेळी भाजपचे असंख्य कार्यकर्ते सोबत होते.

# शॉर्टसर्किटमुळे गहू व कुटाराची राख रांगोळी

## उघड्या रोहित्रामुळे गाईचा मृत्यू

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अकोट :** अकोट तालुक्यामधील सातपुड्याच्या पायथ्यात वसलेले बोरी कोहा कुंड हे गाव आदिवासी तथा दुग्ध व्यवसाय करणारे गवळी समाजाचे ठिकाणी वास्तव असून शेत शिवार गट क्र. २३ संपूर्ण परिसर हा मोठमोठी कुठाराच्या ठिघारे यातच कर्जबाजारी विष्णू रामाजी खडके या शेतकऱ्यांनी गावालगत २ एकर गाव हा काढणीला ढिगारे लावले होते व काही उचलणे बाकी होते.

बुधवार दि. १५ ला दुपारी १२ ते १ वाजता दरम्यान अचानक जिवंत कुलमडलेल्या तारा त्या एकमेकांना जोडल्यामुळे आगीचे जिवंत गोळे जमिनीवर पडले व आगीचे महाकाय स्वरूप तांडवांमध्ये रूपांतर झाले यावेळी गावकऱ्यांना धुर दिसून आला सर्व शेतकरी व गावकऱ्यांनी आग लागली आग लागली विजवण्यासाठी शेतात पळ काढला आग विझवण्यासाठी शेतकऱ्यांनी अनेक शर्तीचे प्रयत्न केले शेतामध्ये असलेली जिवंत महावितरण चा खांब यावर अग्नीचे गोळे पडून तेथे शॉर्टसर्किट झाल्यामुळे तिथूनच गव्हाला आग लागली असे येथील सर्व शेतकऱ्यांनी डोळ्यांनी उपस्थित असताना पाहिले व या



घटनेची शॉर्टसर्किट मुळे गव्हाला आग लागली व लाखोचे नुकसान झाले असे सर्व गावकरी च्या म्हणण्यानुसार गव्हाच्या ढिगाऱ्यामध्ये ५० क्विंटल गहू जळून खाक झाला व ३ ट्रॉली कुटाराची राखरांगोळी झाली या अग्नितांडवांमध्ये शेतकऱ्याचे दीड लाख रुपये नुकसान झाले आहे, गुराढोरांना कुटार सुद्धा नाही व खडके परिवाराला उदरनिर्वाह उपासमारीची वेळ आली आहे, रोडवरील गोपाल सोनूजी खडके यांची मोठी गाय गोठ्याला लागून असलेल्या डीपीवरील डीपी वरील दुर्लक्षित जिवंत तार उघड्यावर असलेल्या शॉर्ट मुळे गाय जागीच तळपळून मृत्यू झाली यामध्ये त्यांनी वितरण कंपनीला तक्रार करूनही कुठलीच मदत नुकसान भरपाई मिळाली नाही, गेल्या २ दिवसा अगोदर येवले गावालगत डीपीवरील दुपारी १२ वाजता जिवंत आगीचे गोळे पडून आग लागली होती यावेळी घरगुती महिलांनी आग विझवण्यासाठी सर्दीचे प्रयत्न करून आग विझवली तर काही घरात आजही महावितरणचे कोलमडलेले जिवंत तार त्यांच्या अगदी घरामधून गेलेले आहेत यावर केव्हाही जीवित हानी होण्याची घटना नाकारता येत नाही याला सर्वस्व जबाबदारी किंवा जबाबदार महावितरण कंपनी राहील असे येथील गवळी समाजाच्या सर्व गावकरी शेतकऱ्यांचे ओरड आहे, या घटनेची माहिती पणज महावितरण सहाय्यक अभियंता वीरेंद्र काळपंडे यांना देऊन त्यांनी पाहणी केली व आग नेमकी कशाने लागली हे वरिष्ठ विद्युत निरीक्षक अकोला अहवाल देतील माहिती दिली, विकी खडे, रमेश खडके, रामेश्वर बावस्कर, विकास खडके, शंकर क्षणमारे, मोहन खडके, पुंडलिक बावस्कर, अनिल हेकडे, अक्षय खडके व इतरही शेतकरी व गावकऱ्यांनी आग विझवण्यासाठी जीव धोक्यात टाकून शर्तीचे प्रयत्न केले. यावेळी झालेल्या आगीचे नुकसान भरपाई देण्यात यावी अशी सर्व शेतकऱ्यांची मागणी जोर धरत आहे.

रस्त्यावरील गावठाण डीपीवर सर्व भोंगळ कारभार असून कुणाचीही जीवित हानी होऊ शकतो २ ते ३ वेळा आग लागून महिलांनी भिजवली तक्रार देऊन सुद्धा कोणीच दखल घेत नाही घटना घडल्यास याला जबाबदार महावितरणच अधिकारी राहील,

**निलेश शनवारे** बोरी गवळी नागरिक

................

मुख्य रस्त्यावरील डीपी जिवंत तार रोहित सर्व उघडे व महावितरण भोंगळ कारभार गाईच्या जीवावर उठला व तडफडून जागीच मृत्यू झाला मुख्यमंत्री म्हणतात आम्ही शेतकऱ्याच्या पाठीशी आहोत तक्रार देऊन नुकसान तर सोडाच साधं पाहणी पंचनामा सुद्धा नाही साहेब...! अशी बेजबाबदार मगरूर परिस्थिती आहे,

**मोहन खडके** बोरी नागरिक,

................

माझ्या गावालगत २ एकर शेतातील महावितरणच्या जिवंत कुलमडलेल्या तारा गुंडाळून अग्नीचे गोळे पडून शॉर्टसर्किट झाले त्यामुळे ५० क्विंटल गहू व ४ ट्रॉली कूटार जळून खाक झाले मला तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी,

**विष्णू रामाजी खडके**
नुकसानग्रस्त शेतकरी, बोरी

## पाणपोई उभारणी झाली पूर्ण महापालिका प्रशासन लागले कामाला

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अकोला:** सध्या अकोला शहर संपूर्ण राज्यात तापमानाच्या बाबतीत नंबर एकवर पोहोचले आहे. जिल्ह्यात सूर्य आग ओकत असताना व उन्हाची तीव्रता वाढली असताना तहानलेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी उभारलेल्या शहरातील अनेक पाणपोया मात्र बंद अवस्थेत असल्याचे चित्र समोर आले आहे. पण, जिल्हा व महापालिका प्रशासनाने मे हिट पुर्वी पाणपोई सुरु करण्यावर भर दिला आहे. कडक उन्हातही पिण्याच्या पाण्याची सोय नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असून या पाणपोया तातडीने सुरू कराव्यात अशी मागणी होत आहे. अकोला शहरात विविध ठिकाणी उन्हातान्हाने त्रस्त झालेल्यांना मोफत पाणी मिळावे या उद्देशाने पाणपोया उभारण्यात आल्या होत्या. मात्र सध्या त्यापैकी बहुतांश पाणपोया बंद पडल्या असून त्यांची योग्य देखभाल होत नसल्याचे दिसून येत आहे. हजारो रुपये खर्च करून



उभारण्यात आलेल्या या पाणपोया बंद असतानाच त्या ठिकाणी जाहिराती तसेच फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाल्याचेही आढळून आले आहे. नवीन बस स्थानका समोर पाणपोयी उभारण्यात आली आहे. परंतु त्या ठिकाणी अद्यापही माठ व पाण्याची व्यवस्था नसल्याचे दिसून येत आहे. जुने बस स्टॅन्ड, जैन मंदिरासमोर उभारण्यात आलेल्या पाणपोई देखील दुर्लक्षामुळे जीर्ण अवस्थेत असल्याचे दिसून येते.

# आमदार हरीश पिंपळे यांचा एक व्हिडिओ व्हायरल

## गावकऱ्यांमध्ये तीव्र स्वरूपाची नाराजी केली गेली व्यक्त

प्रतिनिधी १९ एप्रिल

**अकोला:** बार्शीटाकळी तालुक्यातील राजंदा गावात घडलेली एक घटना सध्या सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. मूर्तिजापूर विधानसभेचे आमदार हरीश पिंपळे यांचा एक व्हिडिओ व्हायरल होत असून, त्यामध्ये गावातील महिलांनी मांडलेल्या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

राजंदा गावातील अनेक महिला आपल्या विविध समस्या मांडण्यासाठी आमदार पिंपळे यांना भेटण्यासाठी त्यांच्या गाडीपाशी गेल्या होत्या. मात्र, आमदारांनी त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून न घेता तिथून निघून गेल्याचे व्हिडिओत दिसत



आहे. यामुळे उपस्थित ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली. घटनेत आणखी एक बाब विशेष ठरली, ती म्हणजे आमदारांनी सामाजिक कार्यकर्ते मयूर काळे यांना सुनावल्याचा आरोप.

महिलांच्या प्रश्नांवर संवाद साधण्याऐवजी त्यांनी काळे यांच्यावर नाराजी व्यक्त करत तिथून निघून गेल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर गावकऱ्यांनी 'हा सत्तेचा माज नाही का?' असा थेट सवाल उपस्थित केला आहे. गेल्या १७ वर्षांपासून या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदारांकडून अधिक संवेदनशीलतेची अपेक्षा होती, असेही काही ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, राजंदा गावासह परिसरातील अनेक गावांमध्ये मूलभूत समस्या अद्याप कायम असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळेच महिला मोठ्या संख्येने आमदारांशी थेट संवाद साधण्यासाठी आल्या होत्या. मात्र, अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने नाराजी उफाळून आली.

# चालकाच्या स्टंटबाजीमुळे चिमुकल्याचा बळी



प्रतिनिधी १९ एप्रिल

**बुलढाणा:** हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे टोल प्लाझा, मेहकर नजीक आज सकाळी ५.३० मिनिटाला भीषण अपघात घडला. मोबाईलवर व्हिडिओ काढत असताना बस चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्यामुळे लक्झरी बस पलटी होऊन समोरून येणाऱ्या कारला जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत दीड वर्षांच्या चिमुकल्या पियुष यशपाल राठोड याचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक १७ जखमी झाले आहेत. या भीषण अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून संबंधित चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, MH 29 BE 2333 क्रमांकाची लक्झरी बस चालक मोबाईलवर व्हिडिओ शूट करत होता. यावेळी त्याचा ताबा सुटल्याने बस पलटी झाली आणि MH 40 ED 1348 क्रमांकाच्या कारला धडकली.

### रुग्णालयात डॉक्टरांचा विलंब; संतापाची लाट

जखमींना ग्रामीण रुग्णालय, मेहकर येथे दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यानंतर तब्बल अर्धा तास डॉक्टर उपस्थित नसल्याची गंभीर बाब समोर आली. या दरम्यान ब्रदर व सिस्टर यांनी प्राथमिक उपचार केले, तसेच काही नागरिकांनीही मदत केली. डॉक्टर वेळेवर उपलब्ध नसल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### टोल कर्मचाऱ्यांचे धाडस; अनेकांचे प्राण वाचले

अपघातानंतर समृद्धी टोल नाका, मेहकर येथील कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जीवाची पर्वा न करता त्यांनी बसमध्ये घुसून जखमींना बाहेर काढले. त्यांच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, 'वेळीच मदत मिळाली नसती तर काही जणांचा गुदमरून मृत्यू झाला असता.'

### प्रवाशाची हकीकत - चालक रील बनवत होता

बंजारा ट्रॅव्हल्समधील प्रवासी रतन नेमाडे यांनी संपूर्ण घटना सांगितली. ते पनवेलहून प्रवास करत होते व केबिनमध्ये बसले होते. रात्री तीनच्या सुमारास दुसऱ्या चालकाने वाहन हातात घेतले. काही मिनिटांतच त्याने मोबाईलवर रील बनवण्यास सुरुवात केली. नेमाडे यांनी चालकाला वारंवार विनंती करूनही तो ऐकला नाही. गाणे लावून रील बनवणे सुरूच होते. मेहकर समृद्धी टोल नाका जवळ उतारावर बस वेगात असतानाही चालकाने वेग कमी केला नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK